**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 602 नाग/2011**

श्री मनोहर पांडुरंग सदावर्ते, सचिव
शबरी आदिवासी बहु उद्येशिय शिक्षण मंडळ
25, बिनाकी, बापु पाटलांची वाडी,
मेहंदीबाग रोड नागपूर –17 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण सहसंचालक (प्राथमिक)
प्राथमिक शिक्षण संचालनालय
मध्यवर्ती इमारत पुणे–1
2) श्री के. पी. देशमुख
जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,
प्राथमिक शिक्षण संचालनालय
मध्यवर्ती इमारत पुणे–1 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 1.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 24.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण संचालनालय मध्यवर्ती इमारत पुणे यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन शबरी आदिवासी बहु उद्येशिय शिक्षण मंडळ तर्फे शैक्षणिक संस्था चालविण्यात येत आहे. संस्थेच्या इयत्ता 5 ते इयत्ता 7 वी च्या वर्गांना सन 2008–2009 पासून अनुदान मिळण्याचा प्रस्ताव सादर केलेला होता. त्यावर केलेल्या कार्यवाहीची त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 30.12.2010 च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. आणि त्या माहिती मध्ये त्यांना असे कळविले की इयत्ता 5, 6, 7 वी च्या वर्गांना अनुदान मंजुर करण्याबाबत सन 2008–2009 च्या प्रस्तावा संबंधात सदरचा प्रस्ताव जिल्हा मुल्यांकन समितीस सादर करण्यात आला. तथापी सरासरी उपस्थितीचा निकष पूर्ण करीत नसल्यामुळे सदर प्रस्ताव अपात्र ठरला आहे असे त्यांना कळविण्यात आले होते. तथापी त्यांनी सन 2009–2010 या वर्षाचा देखील प्रस्ताव सादर केला असता त्याबाबत त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी श्री के. पी. देशमुख हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण सहसंचालक यांच्या वतीने देखील त्यांनाच प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

4. जन माहिती अधिकारी श्री देशमुख यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 24.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता.

त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 3.12.2010 च्या पत्राने सन 2008–2009 च्या प्रस्तावाची माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र सन 2009–2010 च्या प्रस्तावाची छाननी सद्यस्थितीत त्यांच्या कार्यालय स्तरावर सुरु आहे आणि छाननीअंती सदरचा प्रस्ताव निकषात बसत असल्यास सदरचा प्रस्ताव शासनाकडे अनुदान मंजुरीसाठी सादर करण्यात येईल असे श्री देशमुख यांनी आयोगापुढे सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दि. 24.11.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. 3.12.2010 च्या पत्राने सन 2008–2009 या वर्षातील प्रस्तावाची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी सन 2009–2010 च्या प्रस्तावाची माहिती देखील उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या सन 2009–2010 च्या प्रस्तावाची वर नमुद केलेली वस्तुस्थिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने कळवावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2081-2082

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 605 नाग/2011**

श्री मु—हारी जयराम शेन्डे
मु. पो. चौगान
ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री के. जी. खोब्रागडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
लघु सिंचाई(जि.प.) उपविभाग—नागभीड
ता. नागभीड जि. चंद्रपूर
2) श्री एम. टी. खापने शाखा अभियंता
जन माहिती अधिकारी
लघु सिंचाई(जि.प.) उपविभाग—नागभीड
ता. नागभीड जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 1.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 22.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता लघु सिंचाई(जि.प.) उपविभाग—नागभीड ता. नागभीड जि. चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांच्या सेवा पुस्तकाची दुय्यम झेरॉक्स प्रत त्यांनी मागितलेली होती. आणि सन 1993 ते 1998 च्या रोजंदारीच्या फरकाची रक्कम त्यांना मिळाल्याबाबत व्हाऊचरची झेरॉक्स प्रत त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 22.12.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी लघु सिंचाई (जि.प.) उपविभाग यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता श्री एम. टी. खापने हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री के. जी. खोब्रागडे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 22.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 26.11. 2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयातील कनिष्ठ लिपीक श्री सयाम यांचेशी संबंधीत असल्याने त्यांच्याकडून त्यांनी माहिती प्राप्त केली आणि त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 22.12.2010 च्या पत्राने सेवा पुस्तकाची आणि फरकाची वस्तुस्थितीची माहिती उपलब्ध करुन दिली असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपविभागीय अधिकारी लघु सिंचाई(जि.प.) उपविभाग यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 1.1.2011 च्या पत्राने प्रथम अपील फेटाळल्याचे कळविल्याचे त्यांनी सांगितले.

5. जन माहिती अधिकारी यांच्याकडील दि. 22.12.2010 च्या पत्राने प्राप्त झालेली माहिती अपीलकर्त्यास मिळाल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. मात्र त्यांना सेवा पुस्तकाची प्रत आणि फरकाची रक्कम अद्याप त्यांना मिळालेली नाही. तसेच त्यांना यापुर्वी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून सेवा पुस्तक तयार करण्याबाबत कळविले होते आणि आता जन माहिती अधिकारी यांनी दि. 22.12.2010 च्या पत्राने असे कळविले की सेवा पुस्तक तयार केलेले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्यास त्यांच्या कार्यालयाने यापुर्वी दि. 30.12.1998 च्या पत्राने सेवा पुस्तक तयार केल्याबाबतची दिलेली माहिती ही चुकीची आहे प्रत्यक्षात अपीलकर्त्याचे सेवा पुस्तक अद्यापपर्यंत तयार केलेले नाही. त्याचे कारण असे की अपीलकर्ता हे रोजंदारीवरती कार्यरत होते. त्यासाठी सी आर टी वर पदस्थपनेकरीता शासनाला प्रस्ताव पाठविलेला आहे. शासनाकडून तो प्रस्ताव मंजुर झाल्यावर सेवा पुस्तक तयार करण्याची कार्यवाही करण्यात येईल असे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे. तसेच अपीलकर्त्याचे सन 1993 ते 1998 चे फरकाच्या रकमेचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविलेला होता. तथापी त्या संदर्भात त्रुटी आढळल्यामुळे पुन्हा त्रुटींची पूर्तता करुन अपीलकर्त्याचा सदरचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता यांचेकडे दि. 28.7.2011 च्या पत्राने पाठविलेला आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्ता हे रोजंदारीवर कार्यरत असल्यामुळे सेवा पुस्तक तयार केलेले नाही. तसेच त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्याचप्रमाणे

सन 1993 ते 1998 च्या फरकाचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता यांच्याकडून मंजुर झाल्यानंतर फरकाची रक्कम अपीलकर्त्यास अदा करण्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. तथापी अपीलकर्त्यास वर नमुद केलेली वस्तुस्थिती कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता हे रोजंदारीवर कार्यरत होते त्यामुळे सेवा पुस्तक तयार केलेले नाही. मात्र यापूर्वी त्यांच्या कार्यालयाकडून दि. 30.12.1998 च्या पत्राने सेवा पुस्तक तयार केल्याबाबत जे कळविलेले आहे ते योग्य नसल्याचे दिसून येते असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळवावे.
3) अपीलकर्त्याच्या सन 1993 ते 1998 च्या कालावधीतील फरकाचे बील मंजुरीचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता सिंचाई जि. प. चंद्रपूर यांचेकडे सादर केलेले आहे. त्यांच्याकडून मंजुर झाल्यानंतर फरकाची रक्कम 30 दिवसात अदा करण्यात येईल हे देखील स्पष्टपणे अपीलकर्त्यास हा आदेश मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत कळवावे.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2084-2086

जा.क्र.—————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 603 नाग/2011**

श्रीमती मनिषा हिरामण सोनवाने
तिवारी कॉलनी, गुरुनानक वार्ड, गणेश नगर गोंदिया
ता. जि. गोंदिया – 441601 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कृषी सहसंचालक(आस्था)
कृषी आयुक्तालय, पुणे
साखर संकुल, शिवाजीनगर पुणे–5
2) श्री अशोक भगवान देसाई
जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक(क.क.)
कृषी आयुक्तालय, पुणे
मध्यवर्ती इमारत पुणे 1 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक 21.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 1.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 1.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक(क.क.) कृषी आयुक्तालय, पुणे यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गोंदिया यांच्या कार्यालयात सन 2010 मध्ये गट ड पद शिपाई भरतीमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराबाबत त्यांनी तक्रार केलेली होती. त्या तक्रार अर्जावर अडसुळ व श्री ननवरे यांची द्विसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. त्या चौकशी समितीच्या अहवालाची प्रत अपीलकर्तीने मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 18.1.2011 च्या पत्राने असे कळविले की आपल्या तक्रार अर्जान्वये कृषी आयुक्तालय, पुणे यांनी मुद्येनिहाय सखोल चौकशी करण्यासाठी द्विसदस्यीय चौकशी समिती गठीत केली असून त्यांच्याकडून चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. सदर प्रकरणी कार्यवाही पूर्ण झालेली नसल्याने तसेच माहिती प्रकट केल्यास चौकशीच्या कार्यवाहीवर विपरीत परीणाम

होण्याची शक्यता असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1) (ज) व (झ) अन्वये माहिती देण्यास नाकारण्यात येत आहे असे त्यांना कळविण्यात आले. म्हणून त्यांनी प्रथम अपील कृषी सहसंचालक(आस्था) कृषी आयुक्तालय, पुणे यांचेकडे दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील खारीज केले असल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक श्री अशोक भगवान देसाई हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री एस. के. साने हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक श्री अशोक देसाई यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 1.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 29.12.2010 रोजी पोस्टाद्वारे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 18.1.2011 च्या पत्राने असे कळविण्यात आले की आपण मागणी केलेला चौकशी अहवाल प्राप्त झालेला नाही तसेच सदर प्रकरणी कार्यवाही पूर्ण झालेली नसल्याने सदरची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1) (ज) व (झ) अन्वये नाकारण्यात येत आहे असे अपीलकर्त्यास कळविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले.

5. प्रस्तूत प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की दि. 18.1.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास वरील प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली मात्र त्यानंतर द्विसदस्यीय समितीच्या चौकशीचा अहवाल त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे. आणि सदरच्या चौकशी अहवालावर त्यांच्या कार्यालयाकडून शासनास दि. 6.4.2011 च्या पत्राद्वारे संबंधीतावर विभागीय चौकशी सुरु करण्याच्या संदर्भात शासनास प्रस्ताव सादर झालेला असून शासन स्तरावर सदरच्या प्रस्तावावर अद्याप निर्णय झालेला नाही. म्हणून अशा परिस्थितीत चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्यास त्याचा विपरीत परिणाम या चौकशीच्या संदर्भात होईल. म्हणून अपीलकर्त्यास सद्यस्थितीत चौकशी अहवालाची प्रत देणे संयुक्तिक व योग्य होणार नाही. त्याचप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1) (ज) व (झ) अन्वये चौकशी प्रक्रियेत विपरीत परिणाम होवून अडथळा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव अपीलकर्त्यास माहिती नाकारलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले. आणि याच कारणास्तव अपीलकर्त्याचे प्रथम अपील खारीज केल्याचे श्री साने यांनी आयोगा पुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने माहिती अधिकारा खालील अर्जात मागितलेल्या चौकशी अहवालाच्या संदर्भात शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे. मात्र अद्याप पर्यंत त्या चौकशी अहवालावर निर्णय झालेला नाही

अशा परिस्थितीत अपीलकर्त्यास चौकशी अहवालाची प्रत दिल्यास त्याचा विपरीत परीणाम होण्याची दाट शक्यता आहे. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 18.1.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य व संयुक्तीक असल्याचे दिसून येते. तथापी सदरच्या चौकशी अहवाला वर निर्णय झाल्यानंतर निर्णयाची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या चौकशी अहवाला वर शासन स्तरावर निर्णय झाल्यानंतर झालेल्या निर्णयाची माहिती तो निर्णय प्राप्त झाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्त्यास माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2088-2090

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 610 नाग/2011**

श्रीमती लता मंगेश बानाईत
नवी शुक्रवारी, दसरा रोड, संदीप प्रिंटींग पेस जवळ, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अशोक पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
गांधीबाग झोन क्र. 6, महानगर पालिका नागपूर
गांधीबाग नागपूर
2) सौ. वर्षा झेलदेव सहा. अधिक्षक
जन माहिती अधिकारी
गांधीबाग झोन क्र. 6, महानगर पालिका नागपूर
गांधीबाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 25.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी गांधीबाग झोन क्र. 6, महानगर पालिका नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांचे घर क्र. 278 वार्ड क्र. 19 नामांतर करण्याबाबत बरेच अर्ज करुनही नामांतर करण्यात आले नाही करीता त्याबाबतची माहिती त्यांना देण्यात यावी अशी माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 24.12.2010 च्या पत्राने उत्तर पाठविले आणि त्यामध्ये 1 व 2 प्रश्नांची विचारलेली माहिती प्रश्नार्थक असल्यामुळे माहिती देता येणार नाही. तथापी प्रस्तूत प्रकरणात वकील श्री भांडेकर यांनी एक नोटिस दिलेली आहे. त्या व्यतिरिक्त कागदपत्रे दिलेली नाही म्हणून नोटिसची झेरॉक्स प्रत पाहिजे असल्यास माहितीचे शुल्क रु. 8/– भरणा करुन कागदपत्रे प्राप्त करुन घ्यावी असे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कळविले. मात्र जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील त्यांचे खारीज केले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी सौ. वर्षा झेलदेव सहा. अधिक्षक हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त श्री अशोक पाटील हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी सौ. वर्षा झेलदेव यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 25.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्यानुसार अपीलकर्त्यास दि. 24.12.2010 च्या पत्राने असे कळविण्यात आले की आपण विचारलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे देता येत नाही. मात्र नोटिसची झेरॉक्स प्रत

पाहिजे असल्यास माहितीचे शुल्क रु. 8/— भरणा करावे असे अपीलकर्त्यास कळविण्यात आले होते. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील सहाय्यक आयुक्त यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि त्यामध्ये अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली असल्यामुळे अपील निकाली काढल्याचे नमुद केले असे श्री अशोक पाटील यांनी आयोगा पुढे सांगितले.

5. त्याचप्रमाणे प्रस्तूत प्रकरणी सहाय्यक आयुक्त यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात आता दि. 13.4.2011 च्या आदेशान्वये नामांतरणाची कार्यवाही करण्यात आलेली आहे आणि त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. अपीलकर्त्याने आयोगा पुढे असे सांगितले की प्रस्तूत प्रकरणात त्यांच्या घराचे नामांतरण केल्या बाबतचे आदेशाची प्रत त्यांना मिळाली. मात्र त्यांच्या नावाने कर मागणी पत्रक मिळालेले नाही त्याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांनी आयोगा पुढे असे सांगितले की सन 2011—2012 च्या कर आकारणीची कार्यवाही सप्टेंबर 2011पर्यंत पूर्ण होईल आणि सन 2010—2011 ची कर मागणी नोटिस अपीलकर्त्यास सप्टेंबर 2011 नंतर पाठविण्यात येईल. म्हणून ही वस्तुस्थिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविणे योग्य होईल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की नामांतरण झाल्याप्रमाणे सन 2011—2012 च्या कर आकारणीची मागणी नोटिस आपल्या नावाने सप्टेंबर 2011 नंतर पाठविण्यात येईल. सदरची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2087-2088

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 615 नाग/2011**

श्री भिमराव भेमटु टेंभरे
विदर्भ हाऊसिंग कॉलनी, C/o. हनुमान मंदिराच्या मागे,
जि. प. चौक, भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक
आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग) पुणे
नविन मध्यवर्ती इमारत, पहिला मजला पुणे–1
2) डॉ. मनोहर पवार
जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक
आरोग्य सेवा मंडळ नागपूर
माताकचेरी, दिक्षा भूमी जवळ, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 17.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी सहसंचालक आरोग्य सेवा पुणे यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सौ. सी. बी. टेंभूर्णे वरीष्ठ लिपीक यांचे विरुध्द केलेल्या तक्रारीची माहिती आणि तक्रारीवर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत त्यांनी मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक आरोग्य सेवा मंडळ नागपूर डॉ. मनोहर पवार हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा हसंचालक यांच्या वतीने श्री ठाकरे मुख्य प्रशासकीय अधिकारी हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी डॉ. मनोहर पवार यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 17.4.2010 चा माहितीचा अर्ज पुणे कार्यालयाकडे दि. 31.5.2010 रोजी प्राप्त झाला होता. सदरचा अर्ज पुणे कार्यालयाकडून नागपूर कार्यालयाकडे प्राप्त झाला. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने दि. 7.6.2010 च्या पत्राने त्रयस्थ पक्षास माहिती देण्याबाबत विचारणा करण्यात आली तथापी त्रयस्थ पक्ष म्हणून त्यांनी कोणतेही उत्तर पाठविले नाही म्हणून अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क रु. 56/– भरण्याबाबत कळविण्यात आले. त्याप्रमाणे अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क दि. 30.11.2010 रोजी भरणा केले. आणि

त्याच दिवशी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. परंतू सौ. सी. बी. टेंभूर्णे वरीष्ठ लिपीक यांचे विरुध्द ज्या संघटनेने तक्रार केलेली आहे त्या संघटनेच्या पदाधिका–याची नावे त्यांना मिळालेली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सौ. सी. बी. टेंभूर्णे वरीष्ठ लिपीक यांचे विरुध्द महाराष्ट्र राज्य आरोग्य कर्मचारी/आरोग्य सहा. संघटना शाखा भंडारा यांनी दि. 2.5.08 च्या पत्राने तक्रार केलेली आहे. त्या तक्रारीची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली आणि तक्रारीवर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. मात्र त्या संघटनेचे पदाधिकारी कोण आहेत याची माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे त्यांनी नमुद केले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. 30.11.2010 रोजी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2090-2091

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 613 नाग/2011**

श्री पांडुरंग गणपतराव सपकाळ
रा. करंभाड वार्ड क्र.1, पारशिवनी
पो. ता. पारशिवनी जि. नागपूर – 441105 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री शिवराज पडोळे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय पारशिवनी
पो. ता. पारशिवनी जि. नागपूर
2) श्री व्ही. ए. चांभारे नायब तहसिलदार
जन माहिती अधिकारी
तहसिल कार्यालय पारशिवनी
पो. ता. पारशिवनी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 7.2.2011 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय पारशिवनी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मौजा करंभाड प.ह.नं.6 भूखंड क्र. 657 मधील गावठाण विस्तार योजने अंतर्गत भूखंड वाटप केलेले आहे त्याबाबत 1 ते 5 मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री व्ही. ए. चांभारे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार पारशिवनी श्री शिवराज पडोळे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री चांभारे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 7.2.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती संकलीत करण्यात आली आणि अपीलकर्त्यास दि. 4.3.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत आयोगापुढे मान्य केले. मात्र मुद्या क्र. 4 शर्तभंग प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना मिळाली नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. त्यावर

तहसिलदार यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेल्या मुद्या क्र. 4 च्या बाबत मौजा करंभाड प.ह.नं.6 भूखंड क्र. 657 मधील वाटप केलेल्या भूखंडच्या बाबतीत शर्तभंग केल्या प्रकरणी अद्यापपर्यंत त्यांच्या कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. म्हणून सदरची माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व तहसिलदार यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. 7.2.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. 4.3.2011 रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी मुद्या क्र. 4 च्या बाबत शर्तभंग प्रकरणी कोणतीही कार्यवाही केलेली नाही असे अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की मौजा करंभाड प.ह.नं.6 भूखंड क्र. 657 मधील भूखंड वाटपाच्या संदर्भात शर्तभंग प्रकरणी अद्यापपर्यत त्यांच्या कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही असे अपीलकर्त्यास व्यक्तीशः किंवा पोस्टाने कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2093-2094

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 621 नाग/2011**

श्री परसराम मारोती उमरेडकर
168/ए, अशोक नगर नागपूर
ता. जि. नागपूर – 440017 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री हुमणे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)
नागपूर महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री अब्दुल रहेमान
जन माहिती अधिकारी तथा सहा. शिक्षणाधिकारी
शिक्षण विभाग नागपूर महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 3.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 4.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. शिक्षणाधिकारी शिक्षण विभाग नागपूर महानगर पालिका नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन नागपूर महानगर पालिकेच्या प्राथमिक शाळेत वर्ष 1950 पुर्वी पहिल्या वर्गात प्रवेश घेण्याकरीता प्रवेशपत्राचे फॉर्म व इतर माहिती या संबंधात अ,ब,क,ड या मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून अ,ब,क मुद्यांची माहिती मिळाली मात्र ड मुद्यांची माहिती म्हणजे नागपूर महानगर पालिकेत प्राथमिक शाळेत प्रवेश घेतेवेळी वर्ष 1950 पुर्वी लागू असलेले प्राथमिक शिक्षण अधिनियम/प्राथमिक शिक्षण नियमाची एक फोटो कॉपी त्यांनी मागितली होती. ती त्यांना उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा. शिक्षणाधिकारी शिक्षण विभाग नागपूर महानगर पालिका नागपूर श्री अब्दुल रहेमान हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) श्री हुमणे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 4.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली. त्या माहितीमध्ये अपीलकर्त्यास अ,ब,क मुद्यांची माहिती दि. 28.12.2010 आणि दि. 2.2.2011 रोजी उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र सदरच्या माहिती अर्जातील मुद्या क्र 'ड' ची माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून अपीलकर्त्याने प्रथम अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक

विभाग) यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली प्रथम अपीलाचा निर्णय दि. 17.3.2011 रोजी निर्गमीत करण्यात आला. आणि त्यामध्ये असे नमुद केले की अपीलकर्त्याने मागितलेली मुद्या क्र 'ड' ची माहिती उपलब्ध नसल्यामुळे ती पुरविण्यास असमर्थ आहे म्हणून प्रथम अपील निकाली काढल्याचे श्री हुमणे यांनी आयोगा पुढे सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहिती अर्जातील माहितीपैकी मुद्या क्र अ,ब,क ची माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र मुद्या क्र 'ड' ची माहिती त्यांना पाहिजे आहे. त्यासाठी अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून त्यांच्याकडील महानगर पालिकेच्या ग्रंथालयात किंवा अभिलेखागारात प्रत्यक्ष हजर राहून उपलब्ध असलेल्या दस्तऐवजाचे निरीक्षण करुन घेवून माहिती उपलब्ध झाल्यास ती प्राप्त करुन घेणे शक्य होईल असे जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले. आणि रेकॉर्डचे निरीक्षण करण्यास अपीलकर्त्यानेही संमती दिली. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता यांनी दि. 20.8.2011 रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून वर नमुद केल्याप्रमाणे दस्तऐवजाचे निरीक्षण करुन घ्यावे आणि निरीक्षणाअंती पाहिजे असलेली माहिती उपलब्ध झाल्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहितीचे शुल्क आकारुन उपलब्ध करुन द्यावी.
3) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर त्यांना आवश्यक असलेल्या रेकॉर्डचे निरीक्षण करुन देण्यास उपलब्ध करुन द्यावे.
4) अपीलकर्ता यांनी निरीक्षणाची कार्यवाही करतांना कार्यालयीन कामकाजात अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.
5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2095-2096

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 554/2011

श्री दिपक महेंद्र पांडे
चुडी मोहल्ला वार्ड नं. 10 पुलगांव
ता. देवळी जि. वर्धा ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री राजेश सरवदे नायब तहसिलदार
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय देवळी
ता. देवळी जि. वर्धा ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 3.8.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 8.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 3.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार हजर आहेत. तसेच गैरतक्रारदार जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय देवळी श्री राजेश सरवदे नायब तहसिलदार हजर आहेत. तसेच संबंधीत साझाचे तलाठी गुंजखेडा श्री वानखेडे हे हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांचे आयोगाकडील अपील क्र. 374/2010 मधील दि. 7.5.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना 7/12 उतारा मध्ये जी नावे आहे त्या संबंधी जे फेरफार घेतलेले दिसून येतात त्या फेरफाराच्या संबंधात उपलब्ध असलेल्या कागदपत्राची प्रमाणित प्रत त्यांना विनामुल्य देण्याबाबत आयोगाचे आदेश होते. मात्र त्यांना फेरफाराच्या संबंधातील कागदपत्र उपलब्ध झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या तक्रारीच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री राजेश सरवदे यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात 7/12 उतारा मध्ये ज्यांची नावे आहेत त्या फेरफाराच्या संबंधातील कोणतेही कागदपत्र तहसिल कार्यालय किंवा तलाठी कार्यालयात उपलब्ध नाही. मात्र सदरच्या संदर्भात 7/12 उता–यावर ज्या व्यक्तींची नावे चढविण्यात आलेली आहेत ती नावे वारसा प्रकरणाच्या नोंदवहीत चढविण्यात आलेली आहेत. आणि सदरची नावे 7/12 उता–यात घेतांना कोणतेही कागदपत्र उपलब्ध दिसून येत नाही. तथापी सदरची नावे महसूल विभागाच्या प्रचलीत पध्दतीप्रमाणे स्थानिक चौकशी करुन वारसान पंजीवर

चढविण्यात आलेली आहे. आणि त्यानंतर वारसान पंजीवरुन 7/12 उता–यावर सदरची नावे चढविलेली आहेत असे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री सरवदे आणि संबंधीत तलाठी यांनी आयोगा पुढे सांगितले. आणि त्याप्रमाणे त्यांनी आयोगासमोर वारसान फेरफार पंजीची नक्कल आणि त्यावर त्याबाबतचे प्रमाणपत्र नमुद करुन सदरची नक्कल तक्रारदारास उपलब्ध करुन दिली. तक्रारदाराने सदरची नक्कल आयोगासमोर स्वीकृत करुन समाधान व्यक्त केले. म्हणून तक्रार खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2098-2099

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 625 नाग/2011**

श्री धनराज किसनजी झाडे
मु. महादुला (पंचाळा)
ता. रामटेक जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री चव्हाण
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, (पंचायत)
पंचायत समिती रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर
2) श्रीमती रमा राजेश भस्मे
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
पंचायत समिती रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 3.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही. मात्र आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती रामटेक श्रीमती रमा राजेश भस्मे हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, (पंचायत) पंचायत समिती रामटेक श्री चव्हाण हे उपस्थित होते.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 16.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 18.10.2010 रोजी प्राप्त झाला होता. आणि सदरच्या माहिती मध्ये अपीलकर्त्याने शासकीय निकषानुसार पंचायत समिती रामटेक मध्ये किती ग्रामपंचायत संख्या आहेत, ग्रामसेवकाची किती मंजुर पदे आहेत, मंजुर साजा निहाय किती ग्रामसेवक मंजुर पदे आहेत इत्यादी संबंधी प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितलेली होती. तथापी सदरची माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे सुरुवातीस अपीलकर्त्यास दि. 28.10.2010 च्या पत्राने कळविण्यात आले की आपण मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे निदर्शनास आलेले आहे म्हणून आपणास नेमकी कोणती माहिती पाहिजे ते स्वतः येवून सांगावे असे अपीलकर्त्यास कळविण्यात आले. तथापी अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयात आले नाही. मात्र त्यांनी दि. 8.11.2010 च्या पत्राने माहितीच्या अधिकारान्वये त्यांना माहिती मिळावी असे कळविले. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली आकडेवारीच्या स्वरुपातील माहिती अपीलकर्त्यास दि. 18.11.2010 च्या पत्राने पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास पोस्टाने

पाठविली असून माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले. तथापी त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील खंड विकास अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. आणि त्यामध्ये मुद्या क्र.5 ची माहिती अपीलकर्त्यास देण्याचे निर्देश दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्र.5 ची माहिती दि. 17.2.2011 च्या पत्राने पोस्टाद्वारे उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले. तथापी त्या माहितीवर अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांना पुन्हा मागणी केल्याप्रमाणे दि. 11.5.2011 च्या पत्राने पुन्हा सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास दि. 16.5.2011 ला प्राप्त झाल्याची पोच जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविली.

4. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 16.10.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. 18.11.2010 च्या पत्राने त्याचप्रमाणे दि. 17.2.2011 च्या पत्राने आणि दि. 11.5.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2099-2100

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 627 नाग/2011**

श्रीमती रुख्मा दशरथराव केवट
ह.मु. पिपरी(कन्हान)
ता. पारशिवनी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सावरकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री गिरीष जोशी
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 14.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी म्हणून श्री क्षिरसागर व मेश्राम हे हजर होते. उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी श्री क्षिरसागर यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दि. 14.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रामटेक यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन रेव्हेन्यू अपील क्र. 40 आणि दिवाणी न्यायालयातील प्रकरण क्र. आरसीएक 116/2004 आणि सिव्हील सुट क्र. 5/1972 या तीन मुद्यांबाबत माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती मिळाली परंतू दिवाणी न्यायालयाच्या स्थगनादेशाची प्रत त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांना दिवाणी न्यायालयाच्या स्थगनादेशाची प्रत मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रामटेक श्री गिरीष जोशी हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. जिल्हाधिकारी नागपूर श्री सावरकर हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रामटेक श्री गिरीष जोशी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच अपीलकर्त्यास दिवाणी न्यायालयाकडून स्थगिती आदेशाची प्रत घेण्यासाठी त्यांना बोलाविले होते. मात्र ते त्यांच्या कार्यालयात आले नाही म्हणून त्यांना प्रत उपलब्ध करुन देता आली नाही. आता दिवाणी न्यायालयाकडील स्थगिती आदेशाची प्रत त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाल्यास त्यांना त्वरीत स्थगनादेशाची प्रत देण्याचे उपविभागीय अधिकारी यांनी आयोगापुढे मान्य केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रामटेक यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत हजर राहून दिवाणी न्यायालयाकडील स्थगनादेशाची प्रत उपलब्ध करुन घ्यावी. सदरची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या प्रतिनिधीस त्वरीत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2102-2103

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 629 नाग/2011**

श्री संजय नामदेव खैरकर
राज्य माहिती आयोग कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती माधुरी मडावी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद कार्यालय रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर
2) श्री एम. डी. तळवेकर मुख्याध्यापक
जन माहिती अधिकारी
नगर परिषद कार्यालय रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 14.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 18.2.2011 रोजी जन माहिती अधिकारी नगर परिषद रामटेक यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सौ. एस.एस.खैरकर यांचे वेतन कपात करण्या संदर्भात माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती मिळाली मात्र अपुर्ण माहिती मिळाली म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपील त्यांचे फेटाळले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी नगर परिषद रामटेक श्री शेगोकर हे उपस्थित होते. तसेच मुख्याध्यापक रामजी महाजन देशमुख विद्यालय रामटेक श्री एम. डी. तळवेकर हे उपस्थित होते. आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद रामटेक श्रीमती माधुरी मडावी हया उपस्थित होत्या.

4. जन माहिती अधिकारी नगर परिषद रामटेक श्री शेगोकर यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 18.2.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही मुख्याध्यापक रामजी महाजन देशमुख विद्यालय रामटेक यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन अपीलकर्त्यास दि. 18.3.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र सदरची माहिती दि. 8.4.2011 रोजी पोस्टाद्वारे प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. आणि अद्यापही त्यांना टिपणीची प्रत आणि मुख्याध्यापकाने मुख्याधिकारी यांच्या कार्यालयाकडे सौ. खैरकर यांच्या वेतन कपातीबाबत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांना मिळालेल्या नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद रामटेक श्रीमती माधुरी मडावी हया उपस्थित होत्या. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाले होते. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि त्यामध्ये असे दिसून आले की जन माहिती अधिकारी यांचेकडे जी कागदपत्रे होती ती पुरविण्यात आलेली आहे आणि अपीलकर्त्यास उपलब्ध असलेल्या दस्तऐवजाची फाईल देखील सुनावणीच्या वेळी दाखविण्यात आली असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढण्यात आल्याचे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती पाठविलेली आहे. तथापी धारीकेतील टिपणीची प्रत आणि मुख्याध्यापकानी मुख्याधिकारी यांच्याकडे सौ. खैरकर यांच्या वेतन कपातीबाबत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांना मिळालेल्या नाही म्हणून सदरच्या प्रती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास टिपणीची प्रत आणि मुख्याध्यापकानी मुख्याधिकारी नगर परिषद रामटेक यांच्याकडे सौ. खैरकर यांच्या वेतन कपातीबाबत पाठविलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2102-2103

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 628 नाग/2011**

श्री शिवकांत एच. जैस्वाल
प्लॉट नं. 1, अमरधन लक्ष्मी अपार्टमेंट
147 अंबाझरी ले–आऊट हिल टॉप, नागपूर
ता. जि. नागपूर – 440033 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
धरमपेठ झोन क्र.2 महानगर पालिका नागपूर
राजाराम वाचनालय, गोमुलपेठ नागपूर 440010
2) श्री पी. ए. शिरसाम
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक
धरमपेठ झोन क्र.2 कर व कर आकारणी विभाग महानगर पालिका नागपूर
राजाराम वाचनालय, गोमुलपेठ नागपूर 440010 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 8.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक धरमपेठ झोन क्र.2 कर व कर आकारणी विभाग महानगर पालिका नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांच्या दि. 23.12.2010 च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. सदरच्या अर्जात त्यांनी असे नमुद केले की ते माजी सैनिक असल्यामुळे त्यांच्या घराच्या मालमत्तेवर महानगर पालिकेने मालमत्ता करात सुट देण्यात यावी असे त्यांनी दि. 23.12.2010 रोजी महानगर पालिकेकडे अर्ज दिला होता त्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. आणि प्रथम अपीलाच्या सुनावणी नंतर दि. 10.3.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाली असल्यामुळे विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी असे त्यांनी सुनावणीत आयोगापुढे नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक धरमपेठ झोन क्र.2 महानगर पालिका नागपूर श्री पी. ए. शिरसाम हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 8.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 10.1.2011 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्ता हे माजी सैनिक असल्यामुळे सैनिकांच्या घराच्या मालमत्तेवर महानगर पालिकेची कर आकारणी करु नये असा त्यांचा दि. 23.12.2010 चा अर्ज महानगर पालिकेकडे प्राप्त झाला होता. त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी जानेवारी, फेब्रुवारी, मार्च या महिन्यामध्ये कराच्या थकबाकी वसुलीची मोहीम सुरु असल्याने ते कर वसुलीच्या कामात अत्यंत व्यस्त होते म्हणून अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत ते माहिती देवू शकले नाही. त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 10.3.2011 च्या पत्राने रजिस्टर पोस्टाद्वारे आवश्यक ती माहिती पाठविल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. 10.3.2011 च्या पत्राने पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र माहिती विलंबाने प्राप्त झाल्याचे सुनावणीत नमुद करुन त्याबाबत कार्यवाही करावी असे आयोगा पुढे सांगितले.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 10.3.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती 30 दिवसाच्या मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नाही कारण अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे दि.10.1.2011 रोजी प्राप्त झाला होता. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत म्हणजे दि. 9.2.2011पर्यंत माहिती देणे आवश्यक होते मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 10.3.2011 च्या पत्राने म्हणजे सुमारे 30 दिवस विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी श्री पी. ए. शिरसाम यांना खुलासा विचारला असता त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की कर वसूलीच्या कामात ते व्यस्त असल्यामुळे 30 दिवसाच्या मुदतीत माहिती देवू शकले नाही तथापी जन माहिती अधिकारी यांनी विलंबाबद्यल केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये शास्तीची कार्यवाही लादणे संयुक्तिक होईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.
2) जन माहिती अधिकारी श्री पी. ए. शिरसाम यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यानंतर अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते आणि विलंबाबद्यल त्यांनी केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही

कारण माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये 30 दिवसाच्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन आवश्यक असते. म्हणून विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी श्री पी. ए. शिरसाम यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 5000/– शास्तीची कार्यवाही लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) सदरच्या शास्तीची रक्कम सहाय्यक आयुक्त धरमपेठ झोन क्र.2 महानगर पालिका नागपूर यांनी करावयाची आहे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2106-2108

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 634 नाग/2011**

श्री निळकंठ छत्रपतीजी आष्टणकर
मु. पो. आजणसरा
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एच. एन. पाणसे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता
जि.प.बांधकाम उपविभाग हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा
2) श्री देवतळे
जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता
जि.प.बांधकाम उपविभाग हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 5.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 21.2.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता जि.प.बांधकाम उपविभाग हिंगणघाट यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन जि.प.बांधकाम उपविभाग हिंगणघाट येथील शाखा अभियंता बाबत 1 ते 7 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अभियंता जि.प.बांधकाम उपविभाग हिंगणघाट यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता श्री देवतळे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता जि.प.बांधकाम उपविभाग हिंगणघाट श्री पाणसे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री देवतळे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 21.2.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 22.2.2011 प्राप्त झाला. मात्र सदरचा अर्ज प्रत्यक्षात त्यांच्याकडे दि. 15.3.2011 रोजी कार्यालयीन टिपणीसह प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली मुद्या क्र. 1 ते 6 कार्यकारी अभियंता प्रधानमंत्री ग्राम सडक योजना विभाग वर्धा यांचे संबंधात असल्यामुळे त्यांचेकडे माहितीचा अर्ज दि. 16.3.2011 रोजी पाठविला. तसेच मुद्या क्र.7 ची माहिती श्री किरण श्री बित्रे शाखा अभियंता प्रधानमंत्री ग्राम सडक योजना यांचेकडून दि. 5.4.2011 ला प्राप्त माहिती अपीलकर्त्यास दिली. तसेच मुद्या क्र.1 ते 6 ची माहिती कार्यकारी

अभियंता बांधकाम विभाग जि. प. वर्धा यांनी पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास दि. 1.6.2011 रोजी देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. सदरची माहिती ही अपुर्ण असल्याचे त्यांनी नमुद करुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून सदरचा माहितीचा अर्ज कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाकडे 5 दिवसाच्या आत हस्तांतर झालेला नाही त्यामुळे त्यांना विलंबाने माहिती उपलब्ध झाल्याचे त्यांनी सुनावणीत सांगितले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता श्री पाणसे यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जि. प. वर्धा यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे त्यांच्या कार्यालयाकडून अपीलकर्त्यास दि. 1.6.2010 च्या पत्राने माहिती पाठविली.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास दि. 21.2.2011 चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे दि. 22.2.2011 प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जि. प. वर्धा यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे सदरचा माहितीचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 6 (3) अन्वये 5 दिवसाच्या आत सदरच्या अर्जाचे हस्तांतरण करणे आवश्यक होते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या अर्जाचे हस्तांतरण कार्यकारी अभियंता यांचेकडे दि. 16.3.2011 च्या पत्राने हस्तांतरण केला. म्हणून सदरचे हस्तांतरण हे 5 दिवसाच्या आत केलेले नाही असे दिसून येते. याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता यांनी आयोगा पुढे लेखी बयाण देवून असा खुलासा केलेला आहे की सदरचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयातील श्री अशोक सुखदेवे यांचेकडे मार्क केलेला होता. तथापी त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे सदरचा अर्ज दि. 15.3.2011 रोजी दिला. म्हणून जन माहिती अधिकारी यांचेकडे सदरचा अर्ज विलंबाने देण्यास श्री अशोक सुखदेवे हे जबाबदार आहेत असे नमुद केले. म्हणून प्रस्तूत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांचेकडून कार्यकारी अभियंता यांचेकडे सदरचा माहितीचा अर्ज 5 दिवसाच्या मुदतीत हस्तांतरण झालेला नाही त्या विलंबास श्री अशोक सुखदेवे हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये शास्तीची कार्यवाही लादणे संयुक्तिक होईल. तथापी श्री अशोक सुखदेवे हे आजच्या सुनावणीस हजर नसल्यामुळे त्यांचा त्याबाबत खुलासा मागणे आवश्यक आहे.

7. अपीलकर्त्यास कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जि. प. वर्धा यांचेकडून दि. 1.6.2010 च्या पत्राने जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये मुद्दा क्.3 च्या संदर्भात कार्यरत असलेल्या शाखा अभियंत्याच्या प्रतिनियुक्तीबाबत माहिती विचारलेली आहे म्हणून सदरचे शाखा अभियंता हे प्रतिनियुक्तीवर आहे अगर कसे या संदर्भाची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे आणि सदरचे अभियंता हे प्रतिनियुक्तीवर असल्यास त्यांच्या आदेशाच्या प्रती उपलब्ध करुन द्याव्या. त्याचप्रमाणे मुद्दा क्. 4 बाबत प्रतिनियुक्तीवर देण्याचे अधिकार कोणत्या अधिकाऱ्याकडे आहे याची माहिती देखील उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्दा क्. 3 आणि 4 बाबत वर नमुद केल्याप्रमाणे प्रतिनियुक्तीच्या संदर्भात विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज वर नमुद केल्याप्रमाणे 5 दिवसाच्या मुदतीत हस्तांतरण कार्यकारी अभियंता यांचेकडे हस्तांतरण केलेला नाही. सदरचे हस्तांतरण विलंबाने केलेले आहे. सदरच्या विलंबास श्री अशोक सुखदेवे हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 10000/– शास्तीची कार्यवाही का करण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगापुढे करावा.

3) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता यांनी प्रथम अपीलाचा निर्णय देतांना अपीलकर्त्यास कार्यालयातील जी माहिती देणे शक्य असते ती उपलब्ध करुन देणेबाबत प्रथम अपीलाचा निर्णय देणे अपेक्षित असतो मात्र तशी कार्यवाही प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागी अभियंता जि. प. बांधकाम विभाग हिंगणघाट यांनी केलेली नाही. म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी याची पुनरावृत्ती करु नये अशी समजही त्यांना देण्यात येत आहे.

4) सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप अभियंता यांनी श्री अशोक सुखदेवे यांचेकडे खुलासा करण्यासाठी पाठवावे.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2092-2094

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 635 नाग/2011**

श्री विजय दिनकर वाईकर
श्री चक्रधर कृपा, म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफिस मागे,
मस्कासाथ, इतवारी, नागपूर
ता. जि. नागपूर – 440002 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रकाश व–हाडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. आयुक्त(सा.प्र.वि.)
महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री श्रीकांत वैद्य
जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक(सा.प्र.वि.)
महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 5.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 14.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन तत्कालीन ॲडिशनल म्युनिसिपल कमिश्नर श्रीमती कुंदन यांनी रिव्हीजन केस नं. 31/आर/2000–2001 मध्ये इंटरव्हेनर होण्यासाठीचा अर्ज दि. 16.2.2002 च्या आदेशाने फेटाळला. सदर निर्णयाच्या आदेशावर इंटरव्हेनरचे अधिवक्ता श्री एस. बी. चौरसिया यांनी माहिती मिळाल्याप्रित्यर्थ स्वाक्षरी केली आहे म्हणून दि.26.2.2002 इंटरव्हेनर बाबतचया आदेशाची दखल दि. 15.10.2003 च्या निकालपत्रात व आदेशात न घेण्याबाबतच्या कारणांची माहिती आणि संबंधीत कागदपत्रांच्या प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. अपीलकर्त्यास संबंधीत नस्तीच्या निरीक्षणासाठी जन माहिती अधिकारी यांचेकडून पत्र प्राप्त झाले तसेच नस्तीमधील टिपणीच्या प्रती त्यांना उपलब्ध झाल्या मात्र निकालपत्रात इंटरव्हेनरचा अर्ज फेटाळला असतांना सुध्दा पुढील सुनावणीस इंटरव्हेनर कसे हजर झाले याबाबतची त्यांना माहिती मिळाली नाही. म्हणून त्यांनी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक(सा.प्र.वि.) श्री श्रीकांत वैद्य हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. आयुक्त श्री प्रकाश व–हाडे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्त्यास दि. 2.1.2011 रोजी संपूर्ण धारीका निरीक्षणासाठी उपलब्ध करुन दिली होती. अपीलकर्त्याने त्या धारीकेचे

निरीक्षण करुन घेवून त्यांना धारीकेतील सर्व टिपणीच्या प्रती त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. मात्र इंटरव्हेनर यांचा अर्ज नामंजुर झाल्यानंतर ते पुढील सुनावणीस कशाच्या आधारे हजर झाले याबाबतची कोणतीही माहिती धारीकेमध्ये दिसून येत नाही. आणि सदरची बाब अपीलकर्त्याने देखील आयोगापुढे मान्य केली.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते सदनच्या प्रकरणात इंटरव्हेनर म्हणून सदरची व्यक्ती कशी हजर झाली याची कोणतीही माहिती त्या धारीकेत दिसून येत नाही. आणि ही वस्तुस्थिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2114-2115

जा.क्र.—————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 637 नाग/2011**

श्री नानाजी जैदास रामटेके
रा. जानवा पो. इटखेडा
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री आर. एस. बंन्सोड वरिष्ठ सहाय्यक
जन माहिती अधिकारी
जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 5.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. तथापी आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद गोंदिया श्री आर. एस. बंन्सोड हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की जलस्वराज्य प्रकल्प कार्यालय हे दि. 30 जुन 2011 रोजी शासनाकडून बंद झालेले आहे आणि या जलस्वराज्य प्रकल्पाचा पदभार हा जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे हस्तांतरण झालेला आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणात जलस्वराज्य प्रकल्पाचे प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून श्री सी.एन.इंगळे गट प्रमुख म्हणून कार्यरत होते. मात्र जलस्वराज्य प्रकल्प बंद झाल्यामुळे त्या संबंधी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेले श्री सी.एन.इंगळे हे त्यांच्या मुळ विभागाकडे रुजू होण्यासाठी त्यांना कर्यमुक्त केलेले आहे.

3. तसेच श्री आर. एस. बंन्सोड यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 6.12. 2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही. त्याबाबत त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या रेकॉर्डची खात्री करण्यात आली. तथापी राज्य माहिती आयोगाकडून द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भात नोटिस प्राप्त णल्यानंतर त्या नोटिसी सोबत अपीलकर्त्याचा दि. 6. 12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे. सदरच्या माहितीच्या अर्जात अपीलकर्त्याने ग्रामपंचायत जानव्हा येथील जलस्वराज्य प्रकल्पाच्या खर्चाबाबत दि. 24.9.2010 ला ग्रामसभा घेण्यात आली. या सभेमध्ये ठरावात नमुद केल्याप्रमाणे खर्चात त्रुटी आढळुन आल्या. र्चाकशी करण्याबाबत दि. 8.10.2010 ला ग्रामपंचायत मध्ये दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची

माहिती त्यांनी मागितलेली होती. सदरच्या तक्रार अर्जावर गट प्रमुख जिल्हा सुविधा चमू जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद गोंदिया यांनी चौकशी करुन सदरचा चौकशी अहवाल दि. 21.4.2011 च्या पत्राने सरपंच ग्रामपंचायत जानव्हा ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया यांचेकडे सादर केलेला आहे आणि त्या चौकशी अहवालात झालेल्या खर्चाबाबत अहवाल दिलेला आहे. सदरच्या चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे मान्य केले.

6. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जलस्वराज्य प्रकल्प कार्यालय हे दि. 30 जुन 2011 रोजी शासनाकडून बंद झालेले आहे. त्या कार्यालयाच्या कागदपत्राचा पदभार हा जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे हस्तांतरण केलेला दिसून येतो. तथापी अपीलकर्त्याचा दि. 6.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेला दिसून येत नाही. मात्र अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात चौकशी अहवालाची प्रत जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्त्यास चौकशी अहवालाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी श्री आर. एस. बंन्सोड यांनी अपीलकर्त्यास दि. 21. 4.2011 चा गट प्रमुख यांच्या चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2117-2118

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 643 नाग / 2011**

श्री कृष्णा चंद्रभान बोदलखंडे
रा. निलडोह, एम.आय.डी.सी.हिंगणा रोड,
नागपूर – 440016 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री रनदिवे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पं)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री सलामपुरे
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (पंचायत विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 6.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 16.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (पंचायत विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन शासन निर्णय क्र. ससअ–2009 / प्र.क्र.117 / पा.पु.16 दि. 7.5.2009 नुसार शौचालयाबाबत सर्व्हेक्षण करुन बचत गटाला किती वर्ष झाले आणि किती पं.स. च्या बचत गटांना शौचालयाच्या सर्व्हेचे बील देण्यात आले इत्यादी बाबत अ ते ड अशी एकुण 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 4.10.2010 च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. मात्र किती पं.स. च्या बचत गटांना शौचालयाच्या सर्व्हेचे बील अदा करण्यात आले याबाबतची त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पं) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 29.11.2010 रोजी घेण्यात आली. आणि सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्यास बील देण्याबाबतची करण्यात येत असलेली कार्यवाहीची माहिती दिली. तथापी त्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक श्री सलामपुरे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पं) जिल्हा परिषद नागपूर श्री रनदिवे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री सलामपुरे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 16.9.2010 चा माहितीचा अर्ज प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती मध्ये काही मुद्यांची माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची होती. तथापी ज्या मुद्यांची माहिती त्यांच्या

कार्यालयाकडे उपलब्ध होती त्या संदर्भात दि. 4.10.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की अद्यापपर्यंत नागपूर जिल्हयातील किती पं.स.मधील गटांना सर्व्हेचे बील अदा करण्यात आलेले आहे त्याबाबतची माहिती त्यांना पाहिजे आहे. याबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने ज्यावेळी माहिती मागितलेली होती त्यावेळी कोणत्याही पं.स.च्या गटांना सर्व्हेचे बील अदा करण्यात आले नव्हते. मात्र त्यानंतर आता नागपूर जिल्हयातील 13 प.सं. पैकी 5 पं. स. च्या अंतर्गत असणा—या बचत गटांना सर्व्हेचे बील अदा करण्यात आलेले आहे. म्हणून सदरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास नागपूर जिल्हयातील ज्या 5 पं. स. च्या अंतर्गत येणा—या बचत गटांना सर्व्हेचे रु. 10/— प्रमाणे बील दिल्याबाबतची माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच रु. 50/— प्रेरक भत्ता देण्याबाबत आवश्यक असणा—या बाबीची वस्तुस्थितीची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2117-2118

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 644 नाग/2011**

श्री सुरेशकुमार रामप्रसादजी शुक्ला
भऊआ कुटी, राष्ट्रसंत वार्ड आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुनिल कोरडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा
2) श्री व्ही. पी. हुड
जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार
उपविभागीय अधिकारी कार्यालय आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 6.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 18.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी उपविभागीय अधिकारी कार्यालय आर्वी ता. आर्वी जि. वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन आर्वी तालुक्यातील सार्वजनिक वितरण प्रणाली द्वारे खाद्य तेल किती स्वस्त धान्य दुकानदारा मार्फत लाभार्थ्यास पुरविण्यात आले आहे आणि तेलाची आवक व वाटप इत्यादी बाबतची त्यांनी माहिती मागितलेली होती. तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडून किती स्वस्त धान्य दुकानदाराचे निरीक्षण करण्यात आले त्याबाबतची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी आर्वी यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीला नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार श्री व्ही. पी. हुड हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, आर्वी श्री सुनिल कोरडे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री व्ही. पी. हुड यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 18.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही तहसिलदार आर्वी कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज तहसिलदार आर्वी यांच्या कार्यालयाकडे

दि. 18.1.2011 रोजी हस्तांतरण केला. मात्र सदरचा अर्ज हस्तांतरण केल्याबाबत त्यांनी अपीलकर्त्याला कळविले नाही.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपविभागीय अधिकारी यांचेकडे दि. 15.3.2011 रोजी दाखल केले होते. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात तहसिलदार आर्वी हे प्रथम अपीलीय अधिकारी असल्यामुळे उपविभागीय अधिकारी, आर्वी यांनी दि. 23.3.2011 च्या पत्राने अपीलकर्त्याचा प्रथम अपीलाचा अर्ज तहसिलदार आर्वी यांचेकडे पाठविला आणि त्याची प्रत अपीलकर्त्यास देवून प्रथम अपीलाच्या संदर्भात तहसिलदार आर्वी कार्यालयाशी संपर्क साधावा असे अपीलकर्त्यास कळविण्यात आल्याचे उपविभागीय अधिकारी, आर्वी श्री सुनिल कोरडे यांनी आयोगा पुढे असे सांगितले. अपीलकर्त्यास उपविभागीय अधिकारी यांचे दि. 23.3.2011 चे पत्र प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की त्यांच्या माहितीच्या अर्जातील काही माहिती तहसिलदार आर्वी कार्यालयाशी संबंधीत आहे. मात्र उपविभागीय अधिकारी यांचेकडून स्वस्त धान्य दुकानदाराचे निरीक्षण करण्यात आले ही माहिती उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधीत आहे म्हणून ती माहिती त्यांना मिळणे आवश्यक आहे.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 18.1.2011 च्या माहिती अर्जातील माहिती ही तहसिलदार आर्वी कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी सदरचा माहितीचा अर्ज तहसिलदार आर्वी यांचेकडे त्याच दिवशी म्हणजे दि. 18.1.2011 रोजी हस्तांतरण केलेला आहे. मात्र सदरचा अर्ज हस्तांतरण केल्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याला कळविले नाही. उपविभागीय अधिकारी यांचेकडून स्वस्त धान्य दुकानदाराचे निरीक्षण करण्यात आले ही माहिती उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याने ती माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तथापी जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी यांनी किती स्वस्त धान्य दुकानदाराचे निरीक्षण केलेले आहे त्याची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तथापी उपविभागीय अधिकारी यांनी स्वस्त धान्य दुकानदाराचे निरीक्षण केले नसल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याचा दि. 18.1.2011 चा माहितीचा अर्ज तहसिलदार आर्वी यांच्या कार्यालयाकडे हस्तांतरण केला. मात्र त्या हस्तांतरण केल्याबाबतची माहिती अपीलकर्त्यास त्यांनी उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच उपविभागीय अधिकारी यांनी स्वस्त धान्य दुकानदाराचे केलेल्या निरीक्षणाबाबतची माहिती देखील जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून अपीलकर्त्यास ही माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला दिसून येतो. या विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांना खुलासा विचारला असता कार्यालयीन कामाच्या व्यापामुळे त्यांच्याकडून अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत माहिती देता आली नाही असा खुलासा त्यांनी नमुद केला. मात्र जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

3) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही उपविभागीय अधिकारी आर्वी यांनी करावयाची आहे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2120-2122

जा.क्र.—————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 645 नाग/2011**

श्री सुरेशकुमार रामप्रसादजी शुक्ला
भऊआ कुटी, राष्ट्रसंत वार्ड आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री करलुके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा
2) जन माहिती अधिकारी
तहसिल कार्यालय आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 6.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 18.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय आर्वी ता. आर्वी जि. वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन आर्वी तालुका परीसिमा क्षेत्र अंतर्गत सार्वजनिक वितरण प्रणाली द्वारे खाद्य तेलाची किती प्रमाणात आवक झाली किती व कोणकोणत्या स्वस्त धान्य दुकानातून किती लाभार्थ्यांना तेल वितरीत केले इत्यादी बाबतची त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही आणि प्रथम अपीलाचा निर्णयही दिला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस तहसिलदार आर्वी श्री करलुके हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की तहसिल कार्यालयामध्ये सद्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी दाखले निर्गमित करण्याचे काम सुरु असल्याने जन माहिती अधिकारी त्या कामात व्यस्त असल्याने त्यांच्या वतीने तहसिलदार हजर झालेले आहेत असे त्यांनी नमुद केले. तहसिलदार श्री करलुके यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 18.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्यावेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री राहूल सारंग हे कार्यरत होते. त्यांनी अपीलकर्त्यास दि. 14.2.2011 आणि दि. 30.3.2011 रोजी असे कळविले की आपण मागितलेली माहिती तयार करण्यात आली असून माहितीचे शुल्क रु. 28/— चालान द्वारे भरणा करुन कार्यालयातून घेवून जावी असे पोस्टाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविल्याचे दिसून येते असे विद्यमान तहसिलदार श्री करलुके यांनी आयोगा पुढे सांगितले. मात्र अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयात हजर राहून माहितीचे

शुल्क त्यांनी भरले नाही म्हणून त्यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे दिसून येते. तथापी याबाबत अपीलकर्त्याने आयोगा पुढे सांगितले की तहसिलदार यांचे दि. 14.2.2011 चे पत्र आणि दि. 30.3.2011 चे पत्र त्यांच्याकडे प्राप्त झाले नाही म्हणून ते माहितीचे शुल्क भरु शकले नाही.

4. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील तहसिलदार यांचेकडे दाखल केलेले होते. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला नाही असे विद्यमान तहसिलदार श्री करलुके यांनी आयोगा पुढे सांगितले. तसेच अपीलकर्त्याचे प्रथम अपील दाखल झाले त्यावेळी प्रभारी तहसिलदार म्हणून श्री राहूल सारंग हे कार्यरत होते. त्यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला दिसत नाही. म्हणून याबाबत त्यांना सक्त ताकीत देण्यात येत असून भविष्यात त्यांनी अशा प्रकारची पुनरावृत्ती करु नये अशी समजही त्यांना देण्यात येत आहे.

5. मात्र विद्यमान तहसिलदार यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले की त्यांनी अपीलकर्त्यास दि. 22.7.2011 रोजी आवश्यक ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन दिलेली आहे. आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची पोच विद्यमान तहसिलदार यांनी आयोगापुढे दाखविली. तसेच आज आयोगासमोर सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्यास खाद्य तेल वितरणाची माहिती देखील विद्यमान तहसिलदार यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्वीकृत करुन समाधान व्यक्त केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास विद्यमान तहसिलदार यांनी आवश्यक ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2124-2125

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 653 नाग/2011**

श्री जिवन दयारामजी जोशी
C/o. The Edge
शॉप नं.4 प्लॉट नं. 44 गजानन नगर
मानेवाडा रिंग रोड नागपूर
नागपूर –27 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
पोलीस महासंचालक कार्यालय
पोलीस मुख्यालय शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई 440001
2) जन माहिती अधिकारी
पोलीस स्टेशन दादर, मुंबई
भवानी शंकर रोड, शैतान चौकी, दादर(प) मुंबई 28 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 8.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त मध्य नियंत्रण कक्ष भायखळा मुंबई यांच्या वतीने पोलीस निरीक्षक श्री अनिल मडावी हे हजर होते. तसेच पोलीस महासंचालक मुंबई यांचया कार्यालयाच्या वतीने श्रीमती प्रज्ञा पाटील कार्यासन अधिकारी हया हजर आहेत.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांच्या वतीने हजर असलेले श्री अनिल मडावी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने दि. 2.2.2011 चा माहितीचा अर्ज पोलीस स्टेशन दादर, मुंबई यांचेकडे केला होता. तो अर्ज दि. 7.2.2011 रोजी त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. पोलीस स्टेशन दादरचे सहा. माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज आणि त्यासंबंधी माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 7.2.2011 च्या पत्राने पाठविली. वरीष्ठ पोलीस निरीक्षक दादर यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. 7.2.2011 च्या पत्राने असे कळविले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही दादर पोलीस ठाणे आवारात असलेले महिला व मुलांकरीता सहायता केंद्र भवानी शंकर रोड, म्हणून दादर मुंबई यांचेशी संबंधीत असून प्रस्तूत प्रकरणी अपीलकर्त्या विरुध्द चौकशी चालू आहे. दादर पोलीस स्टेशनने दिलेली माहिती ही अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 14.3.2011 रोजी पोस्टाने पाठविली. तसेच

अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही पोलीस स्टेशन दादर यांचेशी संबंधीत नव्हती. सदरची माहिती ही महिला व मुलांकरीता सहायता केंद्र भवानी शंकर रोड, दादर मुंबई यांचेशी संबंधीत होती. म्हणून दादर पोलीस स्टेशनच्या जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 14.3.2011 च्या पत्राने ही वस्तुस्थिती कळविलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी महिला व मुलांकरीता सहायता केंद्र यांचेकडे अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज पाठविलेला होता. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी महिला व मुलांकरीता सहायता केंद्र दादर मुंबई यांनी अपीलकर्त्यास दि. 8.5.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी दादर पोलीस स्टेशनमध्ये अपीलकर्त्याचा तक्रार अर्ज दाखल झालेला नाही एफ आय आर किंवा एन सी देखील नोंदविलेले नाही. अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे. करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दादर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केलेली नाही. त्यामुळे प्रस्तूत प्रकरणात एफ आय आर किंवा एन सी नोंद झालेली नाही असे स्पष्टपणे विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने कळवावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2125-2126

जा.क्र.—————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 652 नाग/2011**

श्रीमती शिला रघुनाथ गुप्ता
जवाहर कॉलनी पुलगांव
ता. देवळी जि. वर्धा –442302 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद कारजा (लाड)
ता. कारजा (लाड) जि. वाशिम
2) श्री चंद्रकांत दंडवते
जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता
बांधकाम विभाग नगर परिषद कारजा (लाड)
ता. कारजा (लाड) जि. वाशिम ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 8.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने त्यांचे पती श्री रघुनाथ गुप्ता हजर आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता श्री चंद्रकांत दंडवते हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद कारजा (लाड) यांच्या वतीने वरीष्ठ लिपीक हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने हजर असलेले त्यांचे पती श्री रघुनाथ गुप्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 12.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी नगर परिषद कारजा (लाड) यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन नगर परिषद कारजा (लाड) यांनी दि. 25.8.2010 रोजी बेकायदेशीर बांधकामा बाबत केलेल्या कार्यवाही संदर्भात a b c d e f g h j k इत्यादी मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरुनही त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी यांचेकडे दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील फेटाळले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. आणि आयोगापुढे असे सांगितले की

त्यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी आणि माहितीचे शुल्क रु.50/– भरणा केलेले आहे ते परत करुन त्यांना विनामुल्य माहिती द्यावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता श्री चंद्रकांत दंडवते यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 12.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 14.1.2011 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीपैकी f आणि l या मुद्याची माहिती लेखा विभागाशी संबंधीत असल्याने त्यांच्याकडे दि. 4.2.2011 रोजी पत्र लिहून माहितीचा अर्ज लेखा विभागाला हस्तांतरण केला आणि त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. त्यानंतर बांधकाम विभागाशी संबंधित असलेल्या माहितीचे शुल्क रु. 42/– भरण्याबाबत अपीलकर्त्यास दि. 11.2.2011 रोजी पोस्टाने कळविले. त्यानंतर दि. 3.3.2011 रोजी रोखपालाकडून माहितीचे शुल्क रु. 42/– भरण्याबाबतचा अहवाल त्यांना मिळाला आणि त्याला अनुसरुन दि. 3.3.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास पोस्टाद्वारे माहिती पाठविली असे जन माहिती अधिकारी श्री चंद्रकांत दंडवते यांनी आयोगा पुढे सांगितले. मात्र अद्यापही दि. 11.2.2011 चे माहितीचे शुल्क भरण्याबाबतचे पत्र आणि दि. 3.3.2011 ची माहिती पाठविल्याचे पत्र अपीलकर्त्यास पोस्टाने प्राप्त झाले नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले.

4. तसेच बांधकाम विभागाकडून दि. 3.3.2011 चे पत्र अपीलकर्त्यास पाठविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्त्यास मुद्या क्र. h आणि k याबाबतची माहिती दिलेली नाही तसेच f आणि l या मुद्याची माहिती जन माहिती अधिकारी लेखा विभाग यांनी उपलब्ध करुन दिलेली नाही असे दिसते.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी लेखा विभाग यांनी अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत f आणि l या मुद्याची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 5000/– त्यांचेवर शास्तीची कार्यवाही का लादू नये याचा खुलासा हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाच्या आत आयोगाकडे सादर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता बांधकाम विभाग यांनी अपीलकर्त्यास दि. 3.3.2011 च्या पत्राने माहिती साध्या पोस्टाने पाठविलेली दिसते. तथापी सदरची माहिती अपीलकर्त्यास पोस्टाने मिळाली नाही आणि त्या माहिती मध्ये मुद्या क्र. h आणि k याबाबतची वस्तुस्थितीची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. म्हणून सदरची माहिती आता अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता बांधकाम विभाग नगर परिषद कारजा (लाड) यांनी अपीलकर्त्यास दि. 3.3.2011 च्या पत्राने पाठविलेली माहिती पुन्हा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. आणि त्यामध्ये मुद्या क्र. h आणि k याबाबतची वस्तुस्थिती दर्शक माहिती द्यावी.

2) जन माहिती अधिकारी लेखा विभाग यांनी अपीलकर्त्यास माहिती अर्जातील मुद्या क्र. f आणि l या मुद्याची माहिती 30 दिवसाच्या मुदतीत दिलेली नाही. म्हणून अपीलकर्त्यास सदरच्या मुद्याची माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला आहे म्हणून या विलंबाबद्यल माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 5000/–शास्ती त्यांचेवर का लादू नये याचा खुलासा हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाच्या आत त्यांनी आयोगाकडे सादर करावो.

3) अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला याबद्यल अपीलकर्ता यांचे माहितीचे शुल्क रु. 50/– त्वरीत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास परत करावे. आणि वरील माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2128-2130

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 663 नाग/2011**

सौ. पुनम संजय बंसोड
मु. पो. घोराड
ता. कळमेश्वर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. पी. सुनवानी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय कामठी
ता. कामठी जि. नागपूर
2) श्री एन. आर. टिंगणे
जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी,
तहसिल कार्यालय कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 9.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 30.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय कामठी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मयत श्री गजानन सोमकुवर यांच्या नावावर सन 1982 पासून ते 2010पर्यंत अधिकार अभिलेखानुसार असलेल्या जमिनीबाबत 1 ते 3 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 3.1.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध झाली. मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की मयत श्री गजानन सोमकुवर यांच्या नावावर सन 1982 पासून ते 2010पर्यंत अधिकार अभिलेखानुसार जमिन होती. सन 2006 मध्ये जमिन विक्री केल्यानंतर शिल्लक असलेली 0.77 आर. जमिन त्यांच्या नावावर 7/12 उता–यामध्ये नोंद होणे आवश्यक आहे. कारण सदरची 0.77 आर. जमिनीचे वहीवाटी ते करीत आहे असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी श्री शिंगणे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार कामठी यांच्या वतीने नायब तहसिलदार श्री सुनवानी हे उपस्थित होते.

4. नायब तहसिलदार यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 30.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 4.12.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही मंडळ अधिकारी कोराडी यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांच्याकडे दि. 8.12.2010 रोजी अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज पाठविला. मंडळ अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती तलाठी वारेगांव यांच्याकडून प्राप्त केली आणि अपीलकर्त्यास दि. 3.1.2011 च्या पत्राने युपीसी पोस्टाद्वारे पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मयत श्री गजानन सोमकुवर यांच्या नावावर सन 1982 पासून ते

2010पर्यंत अधिकार अभिलेखानुसार असलेल्या जमिनीबाबत विक्री करुन राहिलेली 0.77 आर. जमिन अपीलकर्ता स्वतः वाहात आहे ती जमिन त्यांच्या नावावर होणे आवश्यक आहे. मात्र याबाबत जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की मयत श्री गजानन सोमकुवर यांच्या नावावर असलेले 2. 82 आर जमिन ही संपूर्ण विक्री केल्यामुळे त्यांच्या नावावर 7/12 उता–यावर कोणतीही जमिन शिल्लक नाही असे रेकॉर्ड वर दिसते. तथापी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की मयत श्री गजानन सोमकुवर यांनी विक्री केलेल्या जमिनीपैकी 0.77 आर. जमिन शिल्लक आहे आणि ती सद्या त्या वहिवाट करीत आहे. म्हणून सदरची जमिन त्यांच्या नावावर 7/12 उता–यावर नमुद करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमुद केले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की मयत श्री गजानन सोमकुवर यांनी विक्री केलेल्या जमिनीपैकी 0.77 आर. जमिन अपीलकर्त्या वहिवाट करीत आहे असे दिसते. तथापी जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की मयत श्री गजानन सोमकुवर यांनी संपूर्ण जमिन विक्री केलेली आहे. म्हणून याबाबत तहसिलदार यांनी अपीलकर्त्याच्या म्हणण्यानुसार शिल्लक असलेल्या 0.77 आर. जमिनीच्या संदर्भात चौकशी करणे योग्य होईल. आणि चौकशी केल्यानंतर अपीलकर्त्यास वस्तुस्थिती कळविणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत तहसिलदार कामठी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे प्रस्तूत प्रकरणात चौकशी करावी आणि चौकशी केल्यानंतर अपीलकर्त्यास वस्तुस्थिती कळवावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2132-2133

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 662 नाग/2011**

श्री चंद्रशेखरजी शामरावजी नाईक
प्लॉट नं.22 गौरी सदन, इंगोले ले–आऊट
गोधणी रोड झिंगाबाई टाकळी नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सचिन तालेवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
स व सु विभाग–2 महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री टेंभेकर
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 9.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड.नेवारे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दि. 14.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. सावनेर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन घरगुती इलेक्ट्रीक मिटर काढण्याबाबत मी दि. 10.1.2011 रोजी दिलेल्या लेखी अर्जान्वये आपण केलेल्या चौकशी अहवालाची व गैरअर्जदाराने मिटर घेण्याकरीता सादर केलेल्या संपूर्ण कागदपत्राची प्रमाणित नक्कल मिळण्याबाबत माहिती मागितलेली होती. त्यांना दि. 19.3.2011 रोजी माहिती मिळाली. परंतू सदरची माहिती अपूर्ण मिळाली म्हणून त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दाखल केले. तथापी प्रथम अपीला नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. सावनेर श्री टेंभेकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री सचिन तालेवार हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री टेंभेकर यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 14.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने घरगुती मिटर बाबत चार व्यक्तींची माहिती मागितलेली होती. त्यापैकी 1) श्री रेवाराम चवरे 2) श्री चंद्रकांत टेकाडे 3) सौ. कल्पना बोबडे या तीन व्यक्तींच्या विज मीटर

बाबतची माहिती त्यांना दिली. मात्र श्री रमेश रामाजी अंबुलकर यांच्या मीटर बाबतची माहिती त्यांच्या कार्यालयात अद्यापपर्यंत आढळुन आलेली नाही कारण त्यांच्या कार्यालयाचे स्थलांतरण झाल्यामुळे कागदपत्रे हलवलेली आहे. तथापी श्री अंबुलकर यांच्या मीटरचे कागदपत्र शोधणे सुरु आहे असे त्यांनी सांगितले.

5. जन माहिती अधिकारी यांचेकडून वर नमुद केलेल्या तीन व्यक्तींची माहिती त्यांना मिळाल्याचे अपीलकर्त्याचे वकीलानी सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्त्याच्या दि. 10.1.2011 च्या तक्रार अर्जावर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत त्यांना मिळाली नाही आणि श्री अंबुलकर यांच्या मीटर बाबतची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी आयोगा पुढे नमुद केले. म्हणून सदरची माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यासाठी अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्याकडील दि. 10.1.2011 च्या तक्रार अर्जावर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत श्री अंबुलकर यांच्या मीटर बाबतची कागदपत्रे विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2133-2134

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 657/2011**

श्री सुनिल गयाप्रसाद मिश्रा
सेंट्रल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ मास कम्युनिकेशन,
व्ही.आय.पी.रोड, धरमपेठ, नागपूर –440010 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री मनिष झोडपे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव(आस्थापना)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 9.8.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 27.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 27.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 9.8.2011 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार यांनी असे नमुद केले की त्यांचे आयोगाकडील अपील क्रमांक 1326/2010 मधील दि. 11.1.2011 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून अद्याप संपूर्ण माहिती मिळालेली नाही. त्यांना अपूर्ण माहिती मिळाली. परंतू श्री पुरण मेश्राम आणि श्री प्रदीप आगलावे यांच्या जातीचे प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रती मिळालेल्या नाहीत तसेच मागास वर्गीय श्रेणीत पदोन्नती झालेल्या कर्मचा–यांचे जातीचे प्रमाणपत्र पडताळणी झाली अगर कसे याची त्यांना माहिती मिळाली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस गैरतक्रारदार जन माहिती अधिकारी श्री मनिष झोडपे हे हजर होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की तक्रारदाराच्या प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी श्री पुरण मेश्राम आणि श्री प्रदीप आगलावे यांच्या बाबतही माहिती उपलब्ध करुन देण्याचे त्यांनी मान्य केले. तसेच सद्या कार्यरत असणा–या कर्मचा–यापैकी मागास वर्गीय श्रेणीत ज्यांना पदोन्नती दिलेली आहे त्यांच्या जातीचे प्रमाणपत्र पडताळणी बाबतही माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे मान्य केले. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

# आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

2) जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारास हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत खालीलप्रमाणे दोन मुद्यांची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

1) श्री पुरण मेश्राम आणि श्री प्रदीप आगलावे यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची प्रत आणि जात वैधता प्रमाणपत्राची प्रत

2) सद्या कार्यरत असणा–या कर्मचा–यांची मागास वर्गीय श्रेणीत पदोन्नती झालेलली आहे त्या कर्मचा–यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी केल्याबाबतची माहिती तक्रारदारास उपलब्ध करुन द्यावी.

3) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2136-2137

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 667 नाग/2011**

श्री सुनिल इश्वरदासजी कांबळे
गणेश नगर बोरगाव(मेघे) वर्धा गंज, वर्धा
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसचिव
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
मंत्रालय मुंबई
2) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
मंत्रालय मुंबई ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 10.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. मात्र उत्तरवादी गैरहजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 31.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन जिल्हा परीषदेतील कामकाजाच्या समायोजना बाबतचे शासन निर्णय व मार्गदर्शक सुचनांचा तपशिल इत्यादीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे दाखल केले. त्यानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस सहसचिव ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दि. 2.8.2011 च्या पत्राने आयोगाकडे लेखी पत्राद्वारे असे कळविले की अपीलकर्त्याने माहितीचा अर्ज सामान्य प्रशासन विभागाकडे केलेला होता. तथापी सामान्य प्रशासन विभागाने अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडे दि. 21.10.2010 रोजी पाठविला. त्याला अनुसरुन ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दि. 1.12.2010 च्या पत्राने अर्जदारास आवश्यक ती माहिती पोस्टाचा दाखला घेवून पाठविलेली आहे. अपीलकर्त्यास पाठविलेल्या दि. 1.12.2010 च्या माहितीची प्रत फॅक्सद्वारे आज आयोगाकडे प्राप्त झालेली आहे. मात्र अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडून दि. 1.12.2010 च पोस्टाने पाठविलेले पत्र अद्याप अपीलकर्त्यास मिळालेले नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले. म्हणून आज सुनावणीच्या वेळी दि. 1.12.2010 च्या माहितीची प्रत उपलब्ध करुन देण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली.

4. जन माहिती अधिकारी ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांनी अपीलकर्त्यास दि. 1.12.2010 च्या पत्राने जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये असे नमुद केले की

जिल्हा परीषदेतील वर्ग 3 आणि वर्ग 4 च्या आस्थापना व त्यांच्याशी निगडीत बाबी हया महाराष्ट्र जिल्हा परीषदा सेवा नियम 1967 नुसार नियुक्ती प्राधिकारी असलेल्या मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परीषद वर्धा यांचेशी संबंधीत असल्याने अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज मुख्य कार्यपालन अधिकारी यांचेकडे हस्तांतरीत केलेला असून त्या पुढील पत्रव्यवहार त्यांच्याशी करावा असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविल्याचे दिसते. म्हणून प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याने मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परीषद वर्धा यांचेशी संपर्क साधणे योग्य होईल.

5. तथापी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 1.12.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने आणि सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास आज आयोगापुढे पुन्हा उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2137-2138

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 673 नाग/2011

श्री शामदेव काशिरामजी तितरमारे
270 चंदन नगर नागपूर
ता. जि. नागपूर –9 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. एल. गुर्जर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त(मुख्यालय)
पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री एस. एस. कुदरे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन)
पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 10.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 3.2.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन) पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांनी दि. 24.1.2011 ला पोलीस स्टेशन सदर येथे दखल पात्र गुन्हा नोंदविण्याकरीता दि. 25. 1.2011 रोजी दोन तक्रारी दिल्या त्या संदर्भात 1 ते 3 मुद्यांवर माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन) पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर श्री कुदरे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त श्री एम. एल. गुर्जर हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त श्री कुदरे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 3.2.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती

काढण्यात आली. आणि अपीलकर्त्यास दि. 1.3.2011 रोजी माहितीचे शुल्क भरण्याबाबत पत्र दिले. अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क दि. 3.3.2011 रोजी भरणा केले आणि त्याच दिवशी अपीलकर्त्यास 1 ते 3 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. तथापी मुद्या क्र. 2 च्या संदर्भात एफ आय आर च्या बाबत त्यांना माहिती मिळाली नाही असे त्यांनी नमुद केले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की एफ आय आर च्या बाबत पोलीस प्रॉसिकेटरने जे अभिप्राय दिले आहे त्याची प्रत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सांगितले. तसेच अपीलकर्त्याच्या अर्जातील तीन मुद्यांवर केलेल्या कार्यवाहीची अद्यावत माहिती देखील आज आयोगासमोर अपीलकर्त्यास दि. 10.8.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन देण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत करुन समाधान व्यक्त केले. म्हणून अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2140-2141

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 672 नाग/2011**

श्री शामदेव काशिरामजी तितरमारे
270 चंदन नगर नागपूर
ता. जि. नागपूर –9 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अशोक पराते वरीष्ठ श्रेणी लिपीक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा वाचक पोलीस उपअधिक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय नागपूर परिक्षेत्र नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री कांबळे
जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय नागपूर परिक्षेत्र नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 10.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 14.2.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय नागपूर परिक्षेत्र नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय नागपूर परिक्षेत्र नागपूर अंतर्गत लघुलेखक संवर्गा विषयी 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून 1 व 2 मुद्यांची माहिती प्राप्त झाली आणि मुद्या क्र. 2 मधील 'इ' मुद्यांची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही तसेच मुद्या क्र. 3,4,5,6 ही माहिती शासनाच्या बदली धोरणाबाबत त्यांनी मागितलेली होती. मात्र त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक श्री कांबळे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री अशोक पराते वरीष्ठ श्रेणी लिपीक हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 14.2.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 10.3.2011 च्या पत्राने त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पाठविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांना मुद्या क्र. 2 मधील 'इ' मुद्यांची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही तसेच मुद्या क्र. 3 ते 6 च्या संदर्भात अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही असे त्यांनी सांगितले.

5. या बाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने माहिती अर्जातील मुद्या क्र. 3,4,5,6 माध्ये शासनाच्या बदली धोरणाच्या संदर्भात माहिती विचारलेली आहे. म्हणून अपीलकर्त्यास शासनाच्या बदली धोरणाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्त्यास मुद्या क्र. 2 मधील 'इ' मध्ये लघुलेखकांना उच्चश्रेणी मंजुरी कुठल्या कार्यालयाने दिलेली आहे याची माहिती त्यांना पाहिजे आहे. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी संबंधित लघुलेखकांच्या सेवापुस्तकातील त्या नोंदीची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्यास त्या सेवापुस्तकामध्ये संपूर्ण नोंदिचा तपशिल असतो. म्हणून अपीलकर्त्यास लघुलेखकांच्या सेवापुस्तकातील नोंदीची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास लघुलेखकांच्या सेवापुस्तकातील उच्चश्रेणी मंजुरीची झेरॉक्स प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2143-2144

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 676 नाग/2011**

श्री झियाउद्यीन फिरोज
किडवाई ग्राऊंड जवळ, लष्करीबाग, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) कु. सोनाली रमेश चव्हाण
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप अभियंता
जि.प.(बांध) उपविभाग हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर
2) श्री शरद श्रावणजी मानकर
जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता
जि.प.(बांध) उपविभाग हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 11.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 4.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता जि.प.(बांध) उपविभाग हिंगणा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन बाबुलाल.(खानसामा) यांना दिलेल्या घरभाडे भत्ता वाहन भत्ता आणि त्यांनी वापरलेल्या इलेक्ट्रीकचे बील इत्यादी बाबतची माहिती दि. 5.4.1976 पासून मागितलेली आहे. तथापि त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उप अभियंता जि.प.(बांध) उपविभाग हिंगणा यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता श्री शरद मानकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप अभियंता कु. सोनाली रमेश चव्हाण हया उपस्थित होत्या.

4. जन माहिती अधिकारी श्री शरद मानकर यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 4.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने विश्रांतीगृह हिंगणा येथील खानसामा श्री बाबललाल चक्रवर्ती यांचे घरभाडे भत्ता वाहन भत्ता आणि त्यांनी वापरलेल्या इलेक्ट्रीकचे बील पुरविण्याबाबत दि. 5.4.1976 पासून माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही काढण्यात आली. आणि अपीलकर्त्यास दि. 31.1.2011 च्या पत्राने माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले. त्याचप्रमाणे पुन्हा दि. 15.2.2011 रोजी शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले. आणि माहितीचे शुल्क भरुन घेवून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे त्यांना कळविले. तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा केले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने उप अभियंता जि.प.(बांध) उपविभाग हिंगणा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा सुनावणी दि. 6.4.2011 ला घेण्यात आली. प्रथम अपीलाचा निर्णय असा देण्यात आला की विश्रामगृहाचे इलेक्ट्रीक बीलाचे रजिस्टर व मासिक वेतन बील रजिस्टर उपलब्ध आहे. दि. 5.4.1976 ते आतापर्यंत अदा करण्यात आलेला घरभाडे भत्ता वाहन भत्ता रेस्ट हाऊस इलेक्ट्रीक बील रजिस्टर बाबत निव्वळ एकुण रकमेची माहिती ठेवण्याची पध्दत नसल्यामुळे असलेले वेतन देयक व इलेक्ट्रीक बील रजिस्टरचे झेरॉक्स प्रती माहितीचे शुल्क भरल्यानंतर पुरविण्यात यावे असा प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला असे कु. चव्हाण यांनी आयोगा समोर सांगितले.

6. याबाबत अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की त्यांना सन 1976 ते आजपर्यंत बाबुलाल.(खानसामा) यांना दिलेल्या घरभाडे भत्ता वाहन भत्ता याची एकत्रित माहिती मिळावी. तथापी तशी एकत्रित माहिती कार्यालयाकडे नाही. वेतन बीलाचे रजिस्टरचे झेरॉक्स प्रत अपीलकर्त्यास शुल्क भरुन देता येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच इलेक्ट्रीक बीलाच्या बाबतीत जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले की श्री बाबुलाल.(खानसामा) यांना स्वतंत्र निवासस्थान दिलेले नाही त्यामुळे त्यांच्या नावावर इलेक्ट्रीक बील येत नाही. त्यामुळे खानसामाच्या इलेक्ट्रीक बीलाच्या प्रती त्यांना उपलब्ध करुन देता येत नाही. मात्र संपूर्ण रेस्ट हाऊसच्या इलेक्ट्रीक बीलाच्या प्रती अपीलकर्त्याने शुल्क भरल्यानंतर उपलब्ध करुन देता येईल असे त्यांनी सांगितले.

7. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास श्री बाबुलाल.(खानसामा) यांना सन 1976 ते आजपर्यंत अदा करण्यात आलेला घरभाडे भत्ता वाहन भत्ता याची माहिती पाहिजे आहे त्यासाठी अपीलकर्त्याने वेतन देयकाच्या झेरॉक्स प्रतीचे शुल्क भरुन घेवून त्या प्राप्त करुन घेणे योग्य होईल. तसेच श्री बाबुलाल.(खानसामा) यांना स्वतंत्र निवासस्थान उपलब्ध करुन दिलेले नसल्यामुळे त्यांना त्यांच्या निवासस्थानाचे स्वतंत्र इलेक्ट्रीक बील येत नाही त्यामुळे त्यांच्या इलेक्ट्रीक बीलाच्या

प्रती देण्याचा प्रश्न उदभवत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून वेतन देयकाचे प्रतीसाठी माहितीचे शुल्क भरणा करुन प्राप्त करुन घ्यावे. जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्याने वेतन देयकाचे शुल्क भरल्यानंतर त्याच्या प्रती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्याव्या.
2) श्री बाबुलाल.(खानसामा) यांना स्वतंत्र निवासस्थान उपलब्ध करुन दिलेले नसल्यामुळे त्यांच्या नावाने किंवा त्यांच्या निवासस्थानाच्या नावाने स्वतंत्र इलेक्ट्रीक बील भरण्याचा प्रश्न उदभवत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्वरीत कळवावे.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2143-2145

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 675 नाग/2011**

श्री विकास गणपतराव शेंडे
नागरी बँक कॉलनी, राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या मागे, वर्धा
ता. जि. वर्धा – 442003 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
नगर विकास विभाग
मंत्रालय मुंबई –32
2) श्रीमती चित्रा पाटोदेकर
जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी(नवि–32)
नगर विकास विभाग
मंत्रालय मुंबई –32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 11.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 11.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी(नवि–32) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन नगर विकास मंत्रालयातील कार्य, नियम, अधिनियम नगर विकासाबाबत विधानसभेत मंजुर करण्यात आलेली विधेयक इत्यादींच्या संदर्भात 1 ते 8 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील निकाली काढले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी(नवि–32) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई श्रीमती चित्रा पाटोदेकर हया उपस्थित झाल्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव यांच्या वतीने त्यांनाच प्राधिकृत करण्यात आले आहे.

4. जन माहिती अधिकारी श्रीमती चित्रा पाटोदेकर यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 11.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 27.10. 2010 रोजी प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन त्यांनी दि. 8.11.2010 च्या पत्राने 1 ते 8 मुद्यांची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली होती. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दाखल केले होते. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 25.3.2011 रोजी घेण्यात आली त्यावेळी अपीलकर्ता हे हजर राहीले नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेवून प्रथम अपीलाचा निर्णय असा देण्यात आला की जन माहिती अधिकारी यांनी संबंधित सर्व मुद्यांवर दि. 8.11.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपील निकाली काढल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले.

5. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 8.11.2010 च्या पत्राने पाठविलेली माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र विधानसभेत पारीत केलेले विधेयक मा. राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी कधी पाठविले व त्याचा तपशिल त्यांना मिळाला नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी मा. राष्ट्रपतीं महोदयांकडे सदरचे विधेयक मंजुरीसाठी सादर करण्यात आलेल्या पत्राची प्रत आयोगा समोर अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. ती प्रत आयोगा समोर अपीलकर्त्याने स्वीकृत केली.

6. अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की दि. 11.10.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 8.11.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे तसेच आयोगासमोर मा. राष्ट्रपतीं महोदयांकडे मंजुरीसाठी पाठविलेल्या विधेयकाची कागदपत्रे अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2141-2142

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 674 नाग/2011**

श्री विकास गणपतराव शेंडे
नागरी बँक कॉलनी, राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या मागे, वर्धा
ता. जि. वर्धा – 442003 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री वंजारी तहसिलदार
जन माहिती अधिकारी
विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 11.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 24.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन बेकायदेशीर अनधिकृत इमारती त्यांच्यावर केलेले कायद्याप्रमाणे कार्यवाही इत्यादीबाबत 1 ते 7 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. परंतू त्यांचे प्रथम अपील स्वीकारले नाही व ते परत केले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर श्री वंजारी हे उपस्थित होते. त्यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 24. 11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 2.12.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही उपसंचालक नगर रचना नागपूर तसेच जिल्हाधिकारी नागपूर त्याचप्रमाणे मुख्याधिकारी महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण नागपूर यांचे कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज संबंधीत कार्यालयांना पाठविण्यात आला आणि त्याबाबतची माहिती अपीलकर्त्यास दि. 4.12.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिली आणि त्यामध्ये असे नमुद केले की आपला माहितीचा अर्ज संबंधीतांना दि. 4.12.2010 रोजी पाठविण्यात आला असून त्यांचेशी संबंधीत असलेली माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी असे अपीलकर्त्यास त्यांनी दि. 4.12.2010 च्या पत्राने कळविल्याचे सुनावणीत नमुद केले.

4. तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आसेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जिल्हाधिकारी नागपूर यांच्या कार्यालयानी

अपीलकर्त्यास दि. 13.12.2010 च्या पत्राने त्यांचेशी संबंधीत असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार नागपूर विभाग नागपूर यांनी त्यांच्या विभागाशी संबंधीत असलेली माहिती अपीलकर्त्यास दि. 18.12.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण नागपूर यांनी अपीलकर्त्यास दि. 5.1.2011, दि. 10.1.2011, दि. 11.1.2011, तसेच दि. 15.1.2011 च्या पत्राने त्यांचेशी संबंधीत असलेल्या मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारीयांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 24.11.2010 च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती वेगवेगळया विभागाशी संबंधीत होती आणि वर नमुद केल्याप्रमाणे त्या संबंधित विभागांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2144-2145

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 691 नाग/2011**

श्री भाऊराव झिंगूजी गोहत्रे
59 बंडू सोनी ले-आऊट परसोडी नागपूर
ता. जि. नागपूर – 22 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ह. मा. मडावी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर
2) श्री डी. डी. एकापूरे
जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 16.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 21.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चिमूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन कु. वैशाली गोहत्रे तत्कालीन आदिवासी विकास निरीक्षक चिमूर यांच्या संदर्भात 13 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून काहि माहिती मिळाली. मात्र लेखा शाखेची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीला नंतरही त्यांना लेखा शाखेची माहिती मिळाली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी श्री एकापूरे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी श्री मडावी हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयातील आस्थापना शाखा आणि लेखा शाखेशी संबंधीत असल्यामुळे त्यांच्याकडून त्यांनी माहिती मागविली. त्यापैकी आस्थापना शाखची माहिती त्यांना प्राप्त झाली ती माहिती अपीलकर्त्यास दि. 5.3.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. लेखा शाखेची माहिती देखील आता तयार झालेली असून अपीलकर्त्यास त्वरीत देण्यात येत असल्याचे जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले की त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 5.3.2011 च्या पत्राने काहि माहिती प्राप्त झाली आहे. मात्र लेखा शाखेची माहिती त्यांना मिळाली नाही ती माहिती त्यांना तीन दिवसात उपलब्ध झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्याकडी दि. 21.1.201 च्या माहिती आर्जातील लेखा शाखेशी असलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2147-2148

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 692 नाग/2011**

श्री दिगंबर नथ्थु रामटेके
कुंभारे नगर पिंपरारोड, श्री राहुल देशभ्रतार यांच्या घरासमोर तुमसर
पो. ता. तुमसर जि. भंडारा 441912 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई
एक्सप्रेस टॉवर्स, 4 था मजला, नरीमन पॉईंट मुंबई 400021
2) श्री दिलीप वेलके कक्ष अधिकारी
जन माहिती अधिकारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई
सिडको भवन, दक्षिण कक्ष, बेलापुर, नवी मुंबई 400614 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 16.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. मात्र आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री दिलीप वेलके हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 7.6. 2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 15.6.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात अशी माहिती मागितलेली होती की अनुसूचित जातीचा कर्मचारी जेष्ठ असूनही बिंदू नामावलीनुसार अनुसूचित जमातीचा अनुशेष आहे. म्हणून अनुसूचित जातीच्या सेवा जेष्ठ कर्मचा–यास पदोन्नती देण्यात येवू नये पदोन्नतीसाठी डावलण्यात यावे याबाबत शासनाच्या आदेशाची/परीपत्रकाची प्रत त्यांनी मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही आसथापना शाखेशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी यांनी दि. 19.6.2010 च्या पत्राने आसथापना–3 शाखेकडे माहितीचा अर्ज पाठवून माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आणि त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. आणि त्यामध्ये असेही कळविले की आस्थापना शाखेकडून माहिती प्राप्त झालेवर देण्यात येईल त्यानंतर अपीलकर्त्याने मागितलेली माहिती आसथापना–3 शाखेकडून तयार करण्यात आली आणि अपीलकर्त्यास

दि. 24.11.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यात आली तसेच जन माहिती अधिकारी यांनी देखील अपीलकर्त्यास सदरची माहिती दि. 3.12.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. अपीलकर्त्यास पाठविलेल्या माहिती सोबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. 18 आक्टोबर 1997 ची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

4. अपीलकर्त्याने प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपील मुख्य प्रशासकीय अधिकारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई यांचेकडे दाखल केले होते. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय 30 दिवसाच्या मुदतीत दिलेला दिसून येत नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीत देण्यात येत असून भविष्यात त्यांनी याबाबीची पुनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

5. तथापी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2148-2149

जा.क्र.————————— दि.................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 690 नाग/2011

श्री रामदास एम. मासुरकर
हिवरी म्हाडा वसाहत, हिवरी नगर नागपूर
ता. जि. नागपूर – 8 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. डी. बलवीर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री राठोड
जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक–2
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 16.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 24.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक–2 नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सन 1984–85 मध्ये शातीनगर 410 अल्प उत्पन्न गट या योजने अंतर्गत मंडळाकडे अर्ज प्राप्त झाले होते. त्या मधील अर्ज क्र. 124862 या क्रमांकाच्या अर्जाची विक्री झालेली आहे. त्या अर्जाची विक्री नोंदवहीतील या नोंदीची प्रत त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी कळविल्यामुळे त्यांनी प्रथम अपील मुख्य अधिकारी नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक–2 नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर श्री राठोड हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी श्री बलवीर हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री राठोड यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 24.9.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 27.9.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. 22.10.2010 च्या पत्राने असे कळविले की आपण नमुद केलेल्या म्हाडा शातीनगर 410 अल्प उत्पन्न गट या योजनेतील नेमके कोणत्या गाळे क्रमांकाचे कागदपत्र आवश्यक आहे याचा बोध होत नसल्यामुळे आपण नमुद केलेला अर्ज क्रमांक कशा संबंधाचे आहे याबाबत आपण स्पष्ट नमुद केलेले नाही. आपणास कोणत्या प्रती हव्या याबाबतही स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे माहिती पुरविणे शक्य नाही असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविल्याचे नमुद केले.

5. तसेच जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा कालावधी हा सन 1984–85 चा आहे म्हणजे सुमारे 20 वर्षा पेक्षा अधीक कालावधीची माहिती अपीलकर्त्याने मागितलेली आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा पुन्हा शोध घेण्यात आला. परंतू माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्यास पुन्हा दि. 30.11.2010 च्या पत्राने प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर देखील माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्त्यास कळविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयाकडे जे रेकॉर्ड उपलब्ध आहे त्याचें निरीक्षण अपीलकर्त्याने केल्यास आणि निरीक्षणा नंतर पाहिजे असलेली माहिती त्यांनी मागितल्यास त्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले. आणि याबाबतच्या रेकॉर्डचे निरीक्षण करण्याची तयारी अपीलकर्त्याने आयोगासमोर दर्शविली. म्हणून जन माहिती अधिकारी आणि अपीलकर्ता यांच्या संमतीने खालीलप्रमाणे आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास रेकॉर्डचे निरीक्षण करण्यासाठी तारीख व वेळ कळवावी. त्याबाबत अपीलकर्त्यास लेखी पत्रद्वारे कळवावे.

2) जन माहिती अधिकारी यांचेकडून रेकॉर्डचे निरीक्षण करुन घेण्याबाबत लेखी पत्र मिळाल्यानंतर अपीलकर्त्याने त्या दिवशी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून रेकॉर्डचे निरीक्षण करुन घ्यावे आणि निरीक्षणाअंती माहिती उपलब्ध झाल्यास त्या माहितीचे शुल्क भरुन घेवून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2151-2153

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 689 नाग/2011**

श्री रामदास एम. मासुरकर
हिवरी म्हाडा वसाहत, हिवरी नगर नागपूर
ता. जि. नागपूर – 8 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. डी. बलवीर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री गिरी
जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक–2
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 16.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 2.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक–2 नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन म्हाडाने हिवरी नगर वसाहत येथे 288 गाळे बांधलेले आहेत त्या संदर्भात सन 1990–91 ते 1997–98 या कालावधीच्या गाळयाचे चेकींग रिपोर्टच्या प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. तसेच या वसाहतीमध्ये ज्यांनी बेकायदेशीर बांधकाम केलेले आहे किंवा अनधिकृत वास्तव्य आहे त्या संदर्भात सक्षम अधिका–याकडे दाखल झालेल्या प्रकरणाचया आदेशाची प्रत तसेच त्या संदर्भात जप्तीच्या कागदपत्रांची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना 30 दिवसाच्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना कोणतीच माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्री गिरी आणि श्री रघुवंशी हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी श्री बलवीर हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 2.9.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात माहिती काढण्यात आली. आणि अपीलकर्त्यास दि. 1. 10.2010 च्या पत्राने माहितीचे शुल्क रु. 4724/– भरण्याबाबत कळविण्यात आले. मात्र दि. 1.10.2010 चे माहितीचे शुल्क भरण्याचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाले नसल्याचे अपीलकर्त्याने

आयोगा समोर सांगितले. तथापी जन माहिती अधिकारी यांनी दि. 1.10.2010 चे पत्र पोस्टाने पाठविल्याबाबत कोणताही अधिकृत पुरावा आयोगा समोर सादर केला नाही किंवा सदरचे पत्र पोस्टाने पाठविण्यासाठी किती रुपयाचे पोस्टाचे तिकीट लावून पत्र पाठविले याबाबतही कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर सादर केला नाही म्हणून अपीलकर्त्यास सदरचे पत्र पाठविल्याबाबत आयोगाची खात्री झाली नाही म्हणून आता अपीलकर्त्यास माहिती पुरविण्यास विलंब झाल्यामुळे विनामुल्य माहिती पुरविणे आवश्यक असल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दि. 2.9.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य अपीलकर्त्यास व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2155-2156

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 238 नाग/2011 व अपील क्रमांक 239 नाग/2011.**

श्री देवेंद्र राघो खोत
प्लॉट क्र. 501, उत्कर्ष पारिजात अपार्टमेंट, खरे टाऊन
धरमपेठ, नागपूर -440010 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**<u>अपील क्रमांक 238 नाग/2011</u>**

1) श्री पी. जी. जाधव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
सामान्य प्रशासन विभाग(11-अ) 6 वा मजला(रुम क्र642 मुख्य)
मंत्रालय मुंबई 32
2) श्री दि. दा. आढाव
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
सामान्य प्रशासन विभाग(11-अ)
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 239 नाग/2011</u>**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव
मुख्य सचिवांचे कार्यालय, 5 वा मजला(रुम क्र413-518 मुख्य)
मंत्रालय मुंबई 32
2) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
मुख्य सचिवांचे कार्यालय, 5 वा मजला(रुम क्र413-518 मुख्य)
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये वर नमुद केलेली दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 17.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांचा विषय एकच असल्यामुळे एकत्रित सुनावणी घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 9.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री सु. स. वाळके उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर आणि श्री दे. रा. खोत सहा. नगर रचनाकार शाखा कार्यालय चंद्रपूर या दोन अधिका–यांच्या निलंबन प्रकरणाचे स्वरुप, गुणवत्ता व वस्तुंस्थिती कोणती होती याबाबत माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपसचिव सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई श्री दि. दा. आढाव हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई श्री पी. जी. जाधव हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री आढाव यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 9.12.2010 चा माहितीचा अर्ज प्रथमतः मुख्य सचिव यांच्या कार्यालयाकडे त्यांनी केलेला होता. त्यांच्याकडून दि. 23.12.2010 रोजी सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे प्राप्त झाला. अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात वर नमुद केल्याप्रमाणे दोन्ही प्रकरणात म्हणजेच श्री सु. स. वाळके यांच्या प्रकरणाचे स्वरुप, गुणवत्ता व वस्तुस्थिती कोणती होती आणि श्री दे. रा. खोत यांच्या प्रकरणाचे स्वरुप, गुणवत्ता व वस्तुस्थिती कोणती याबाबत माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याच्या या माहितीच्या अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 24.12.201 च्या पत्राने अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती पोस्टाद्वारे उपलब्ध करुन दिली आणि सदरच्या माहितीमध्ये असे नमुद केले की समिती समोर पाठविण्यात आलेले कागदपत्र आपणास यापूर्वीच प्राप्त झालेले आहे हे आपण अर्जासोबत जोडलेल्या सहपत्रावरुन निदर्शनास येते. त्याव्यतिरीक्त आपण आपला दि. 9. 12.2010 च्या अर्जामध्ये नमुद केलेला माहितीचा समावेश माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 2 (च) मध्ये होत नसल्याने आपणास माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही अशी माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिल्याचे सुनावणीत नमुद केले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. तथापी अपीलकर्त्यास निलंबन आढावा समितीचे दि. 15.10.2008 रोजीच्या बैठकीचे कार्यवृत्त आणि दि. 24.5.2010 चे निलंबन आढावा समितीचे बैठकीचे कार्यवृत्त प्राप्त झालेले आहे. मात्र त्यावर स्वाक्ष–या नाही म्हणून त्यांना या बैठकीचे सहयांचे कार्यवृत्तांत पाहिजे आहे तसेच या संदर्भात कार्यालयीन टिपणीच्या प्रती उपलब्ध करुन देण्याची विनंती त्यांनी आयोगापुढे केली. त्यावर जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्यास दि. 15.10.2008 च्या आणि दि. 24.5.2010 च्या निलंबन आढावा समितीचे बैठकीचे कार्यवृत्त सही असेलेले उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच या संदर्भात

कार्यालयीन टिपणीच्या प्रती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा पुढे मान्य केले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास निलंबन आढावा समितीचे बैठकीचे दि. 15.10.2008 च्या आणि दि. 24.5.2010 च्या बैठकीचे सही असेलेले कार्यवृत्ताच्या प्रती आणि त्या संदर्भात कार्यालयीन टिपणीच्या प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 15.10.2008 च्या आणि दि. 24.5.2010 च्या निलंबन आढावा समितीच्या बैठकीचे सही असेलेले कार्यवृत्त आणि त्या संदर्भात कार्यालयीन टिपणीच्या प्रती विनामुल्य पोस्टाने उपलब्ध करुन घ्याव्यात.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2158-2160

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 591 नाग/2011**

श्री संजय पी. ठाकरे
व्नसंरक्षक, कार्य आयोजना–1
मध्यवर्ती वनराजिक महाविद्यालय परिसर,
मुल रोड चंद्रपूर –442401 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री संजय दिवाण
प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त
ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री टी. के. रॉय अपर पोलीस अधिक्षक
जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 29.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीत हजर राहण्याचे आदेशित केलेले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 17.8. 2009 रोजी घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की त्यांनी दि. 10.1. 2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन खुल्या चौकशीच्या अनुषंगाने शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सुचना, काढलेल्या स्थायी आदेशांच्या प्रती पुरवठा करण्याची माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 12.1.2011 च्या पत्राने असे कळविले की सदर प्रकरणात आपल्या विरुध्द चौकशी सुरु असल्यामुळे कलम 8 (ज) जिच्यामुळे गुन्हेगारांचे अन्वेषण करण्यास किंवा त्यांना अटकाव करण्यास किंवा त्यांच्यावर खटला दाखल करण्यास अडथळा येईल अशी माहिती उपलब्ध करुन देण्यास असमर्थ आहोत. त्यामुळे त्यांनी प्रथम अपील पोलीस

उपायुक्त ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 21.2.2011 रोजी निर्गमित करण्यात आला. त्यानंतरही त्यांना त्यांच्या मुद्यानुसार माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर श्री रॉय हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त श्री संजय दिवाण हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री रॉय यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 10.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. तथाप अपीलकर्त्या विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखाली चौकशी सुरु असल्यामुळे कलम 8 (ज) प्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलकर्त्यास दि. 12.1.2011 च्या पत्राने कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील पोलीस उपायुक्त/पोलीस अधिक्षक यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 18.2.2011 रोजी घेण्यात आली त्यावेळी अपीलकर्ता हे हजर होते. आणि प्रथम अपीलात त्यांचे म्हणणे एकून घेवून प्रथम अपीलाचा निर्णय दि. 21.2.2011 रोजी निर्गमित करण्यात आल्याचे श्री संजय दिवाण पोलीस उपायुक्त यांनी आयोगापुढे सुनावणीत सांगितले. आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपस्थित केलेल्या मुद्यानुसार मार्गदर्शन करुन प्रकरणाशी संबंधीत शासनाचे परिपत्रक उपलब्ध असल्यास त्यांना विनाविलंब पुरवावे असा प्रथम अपीलाचा निर्णय त्यांनी दिला. प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 28.2.2011 च्या पत्राने कृषी उत्पन्न गणनेची मार्गदर्शक तत्वाची पाने उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र खुल्या चौकशीच्या संदर्भात शासनाचे परिपत्रक मार्गदर्शक सुचना, किंवा स्थायी आदेश ही माहिती त्यांना मिळालेली नाही असे अपीलकर्त्याने आयोगासमोर सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 28.2.2011 च्या पत्राने कृषी उत्पन्न गणनेची मार्गदर्शक तत्वाची माहिती उपलब्ध करुन दिलीले आहे. तथापी खुल्या चौकशीच्या संदर्भात शासनाचे स्थायी आदेश असल्यास त्या आदेशाच्या प्रती किंवा मार्गदर्शक सुचनांच्या प्रती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी खुल्या चौकशीच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयात शासनाकडील स्थायी आदेश असल्यास किंवा मार्गदर्शक सुचनां असल्यास त्याचा शोध घेवून विनामुल्य अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्याव्या. तथापी शोध घेतल्यानंतरही असे स्थायी आदेश किंवा मार्गदर्शक सुचना उपलब्ध झाले नाही तर तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2162-2164

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 700 नाग/2011**

श्री रमेशकुमार मनोहरलाल बाली
फुटाना ओली, कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,
नगर परिषद कामठी
ता. कामठी जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी
(जल प्रदाय विभाग) नगर परिषद कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 17.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 18.2.2011 रोजी जन माहिती अधिकारी (जल प्रदाय विभाग) नगर परिषद कामठी ता. कामठी जि. नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन नगर परिषदेच्या पाणी विभागातील ट्रॅक्टर वर सन 2002 ते 18.2.2011पर्यंत झालेला डिझेल खर्च व झालेला रिपेअरींग खर्च इत्यादीची माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना 30 दिवसात जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी यांचेकडे दाखल केले. आणि प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना दि. 20.5.2011 रोजी विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. सदरची माहिती विलंबाने उपलब्ध झाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री पी. आर. खाडे मुख्य लिपीक नगर परिषद कामठी हे उपस्थित होते. श्री खाडे यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 18.2.2011 चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी नगर परिषद कामठी यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 20.5.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले. दि. 20.5.2011 च्या पत्राने पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र सदरची माहिती 30 दिवसात उपलब्ध करुन दिली नाही म्हणून विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांचे विरुध कार्यवाही करावी असे अपीलकर्त्याने आयोगासमोर सांगितले.

4. अपीलकर्ता आणि जन माहिती अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री खाडे यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 18.2.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर

दि. 20.5.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. वास्तविक पाहता अपीलकर्त्यास दि. 18.2.2011 च्या माहिती अर्जातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसाच्या मुदतीत म्हणजे दि. 17.3.2011पर्यंत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे बंधनकारक होते. तथापी अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 20.5.2011 च्या पत्राने सुमारे 62 दिवस विलंबाने उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे झालेल्या विलंबास जन माहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. या विलंबाबद्यल त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये शास्तीची कार्यवाही का करु नये याचा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आत करणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून विलंबाबद्यल त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 10000/– ची शास्तीची कार्यवाही त्यांच्यावर कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी आयोगाकडे हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत सादर करावा अन्यथा शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2166-2167

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 705 नाग/2011, अपील क्रमांक 706 नाग/2011 आणि अपील क्रमांक 707 नाग/2011**

श्री प्रा. नरेंद्र विनायकराव हरणे
C/o. एस.डी.देव, साने गुरुजी कॉलनी,
रेल्वे स्टेशन रोड, भद्रावती
ता. भद्रावती जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**<u>अपील क्रमांक 705 नाग/2011, अपील क्रमांक 706 नाग/2011</u>**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय, भद्रावती
ता. भद्रावती जि. चंद्रपूर
2) डॉ. के. डी. ठेंगणे
जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय, भद्रावती
ता. भद्रावती जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 707 नाग/2011</u>**
1) प्रथम अपीलीय अधिकारी
भद्रावती शिक्षण संस्था, भद्रावती
ता. भद्रावती जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा सचिव
भद्रावती शिक्षण संस्था, भद्रावती
ता. भद्रावती जि. चंद्रपूर

**( आदेश पारित दिनांक 18.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये अपील क्रमांक 705 नाग/2011, अपील क्रमांक 706 नाग/2011 आणि अपील क्रमांक 707 नाग/2011 अशी तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. या तीन्ही द्वितीय अपीलांमध्ये अपीलकर्ता हे एकच आहेत आणि जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे देखील एकच

आल्यामुळे तीन्ही अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 18.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. **अपील कमांक 705 नाग/2011** – आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 23.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय, भद्रावती ता. भद्रावती जि. चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांना संस्था सचिवांनी महाविद्यालयावर 20 कोटी रुपये खर्च केल्याचे मला पत्राद्वारे कळविले आहे तरी मला संस्था सचिव श्री निळकंठराव शिंदे यांनी स्वतः निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालावर आजपर्यंत केलेल्या वरील खर्चाच्या तपशिलाच्या छायांकीत प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. तथापि त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीला नंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने ॲड. श्री एस. एन. गायकवाड हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 23.12.2010 चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे नव्हती. ती माहिती संस्थेशी संबंधीत असल्यामुळे अपीलकर्त्याने संस्थेकडे ती माहिती मागणे आवश्यक होते. मात्र अपीलकर्त्याने संस्थेकडे माहिती न मागता जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली तसेच अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीमध्ये कोणतीही स्पष्टता दिसून आली नाही असे ॲड. गायकवाड यांनी आयोगा पुढे सांगितले. तसेच सदरचे महाविद्यालय भद्रावती शिक्षण संस्थेचे अंतर्गत असून सदरची शिक्षण संस्था ही बॉम्बे ट्रस्ट ॲक्ट खाली नोंदणी झालेली आहे म्हणून अपीलकर्त्याने सदरची माहिती धर्मदाय आयुक्तांकडे मागणी करणे आवश्यक आहे असे ॲड. गायकवाड यांनी आयोगा पुढे सांगितले.

4. याबाबत अपीलकर्ता यांनी आयोगा पुढे असे सांगितले की त्यांना संस्थेच्या सचिवानी दि. 22.12.2010 रोजी नोटिस दिली आहे. त्या नोटिसीमध्ये महाविद्यालयावर सुमारे 20 कोटी रुपये खर्च केल्याचे त्यांना लेखी पत्राद्वारे कळविलेले आहे. म्हणून त्या 20 कोटी रुपये खर्चाची माहिती त्यांनी मागितलेली आहे असे अपीलकर्त्याने आयोगासमोर सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांच्या वतीने ॲड. श्री एस. एन. गायकवाड यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास संस्था सचिवांनी दि. 22.12.2010 च्या नोटिसीमध्ये असे कळविले की

महाविद्यालयावर 20 कोटी रुपये खर्च झाला आहे त्याचा तपशिल अपीलकर्त्यास पाहिजे आहे. म्हणून संस्था सचिवाच्या दि. 22.12.2010 च्या नोटिसीत उल्लेख केलेल्या 20 कोटी रुपये खर्चाबाबतची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

6. **अपील क्रमांक 706 नाग/2011** – आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 24.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय, भद्रावती ता. भद्रावती जि. चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन डॉ. मित्तल अध्यक्ष नॅक पिअर टीम यांनी महाविद्यालयाला सादर केलेल्या अहवालात माझ्याद्वारे पुरविलेल्या माहितीची सांक्षांकित प्रत त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील प्राचार्य यांच्याकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीला नंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

7. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले ॲड. एस. एन. गायकवाड यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 24.12. 2010 चा माहितीचा अर्ज प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या बाबत कोणताही उल्लेख डॉ. मित्तल अध्यक्ष नॅक पिअर टीम यांनी महाविद्यालयात सादर केलेल्या अहवालात अपीलकर्त्याने पुरविलेली कोणतीही माहिती उपलब्ध नव्हती तसेच डॉ. मितत‍ल यांनी सादर केलेला अहवाल हा गोपनिय स्वरुपाचा असल्यामुळे ती माहिती आपणास उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलकर्त्यास दि. 31.12.2010 च्या पत्राने यापूर्वीच कळविलेले होते असे ॲड. गायकवाड यांनी आयोगा पुढे सांगितले. तसेच सदरचे महाविद्यालय भद्रावती शिक्षण संस्थेच्या अंतर्गत असून सदरची शिक्षण संस्था ही बॉम्बे ट्रस्ट ॲक्ट खाली नोंदणी झालेली आहे म्हणून अपीलकर्त्याने सदरची माहिती धर्मदाय आयुक्तांकडे मागणी करणे आवश्यक आहे असे ॲड. गायकवाड यांनी आयोगा पुढे सांगितले.

8. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले ॲड. श्री एस. एन. गायकवाड यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की डॉ. मित्तल अध्यक्ष नॅक पिअर टीम यांनी महाविद्यालयाला सादर केलेल्या अहवालात अपीलकर्ताद्वारे पुरविलेल्या माहितीचा कोणताही उल्लेख नाही म्हणून अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी तसे स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक होईल. आणि त्याबरोबर डॉ. मित्तल अध्यक्ष नॅक पिअर टीम यांच्या अहवालाची प्रत अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

9. **अपील क्रमांक 707 नाग/2011** – आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 24.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव, भद्रावती शिक्षण संस्था भद्रावतीयांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर

करुन आपण दिलेल्या पत्रात (दि.22.12.2010) मी शैक्षणिक सत्र 2010–11 पासून चंद्रपुर ते भद्रावती बसने जाणे येणे करतो असे म्हटले आहे त्या बद्यलचा एस.टी. महामंडळाकडुन सेस्थेने मिळविलेल्या लेखी पुराव्याची सांक्षांकित प्रत त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीला नंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

10. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले ॲड. एस. एन. गायकवाड यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 24.12. 2010 चा माहितीचा अर्ज प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्त्याचा अर्ज हा संस्थेच्या नावाने दिलेला होता त्याचा कॉलेजशी काही संबंध नाही. तसेच अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही कॉलेजच्या संबंधात नसल्यामुळे देता आली नाही. तसेच सदरचे महाविद्यालय भद्रावती शिक्षण संस्थेचे अंतर्गत असून सदरची शिक्षण संस्था ही बॉम्बे ट्रस्ट ॲक्ट खाली नोंदणी झालेली आहे म्हणून अपीलकर्त्याने सदरची माहिती धर्मदाय आयुक्तांकडे मागणी करणे आवश्यक आहे असे ॲड. गायकवाड यांनी आयोगा पुढे सांगितले.

11. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले ॲड. श्री एस. एन. गायकवाड यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याला संस्थेच्या सचिवांनी दि. 22.12.2010 रोजी नोटीस ाठविलेली असून त्या नोटिसीमध्ये असे म्हटले आहे की अपीलकर्ता हे चंद्रपुर ते भद्रावती बसने जाणे येणे करतात म्हणून त्याचा एस.टी.महामंडळाचा पुरावा त्यांनी मागितलेला होता. तथापी एस. टी.महामंडळाकडुन संस्थेकडे असा कोणताही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही असे ॲड. गायकवाड यांनी आयोगा पुढे सांगितले. म्हणून ही वस्तुस्थिती स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 705/2011 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 20 कोटी रुपये खर्चाची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 706/2011 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास डॉ. मित्तल अध्यक्ष नॅक पिअर टीम यांच्या अहवालाची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच डॉ. मित्तल अध्यक्ष नॅक पिअर टीम यांनी सादर केलेल्या अहवालात अपीलकर्ताद्वारे माहिती पुरविल्याचा कोणताही उल्लेख नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

3) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 707/2011 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की अपीलकर्ता हे चंद्रपुर ते भद्रावती बसने जाणे येणे करतात याबद्यलचा एस.टी.महामंडळाचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नाही

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2168-2172

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 708 नाग/2011**

सौ. अपर्णा बापूजी धोटे
सी–5, जे.के.होम्स, गुरुद्वारा रोड, तुकूम, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय, भद्रावती
ता. भद्रावती जि. चंद्रपूर
2) डॉ. के. डी. ठेंगणे
जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय, भद्रावती
ता. भद्रावती जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक 4.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 18.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 23.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय, भद्रावती यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन महाविद्यालयाच्या स्थापनेपासून सन 2010पर्यंत विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची वर्षनिहाय यादी मागितलेली होती. तसेच विज्ञान शाखेमध्ये डुप्लीकेट टी. सी. वर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील प्राचार्य यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने ॲड. श्री एस. एन. गायकवाड हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्तीचा दि. 23.12.2010 चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्तीने महाविद्यालयाच्या स्थापनेपासून सन 2010पर्यंत विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या यादया मागितलेल्या होत्या. सदरची मागितलेली माहिती ही क्लिष्ट स्वरुपाची असल्यामुळे व विद्यार्थ्यांची अशी यादी कॉलेजमध्ये स्वतंत्र यादी तयार केली जात नाही. त्यामुळे अशी यादी महाविद्यालयाच्या स्थापनेपासून सन 2010पर्यंत महाविद्यालयात उपलब्ध नाही असे ॲड. गायकवाड यांनी आयोगा पुढे सांगितले. तसेच सदरचे महाविद्यालय भद्रावती शिक्षण संस्थेचे अंतर्गत असून सदरची शिक्षण संस्था ही बॉम्बे ट्रस्ट ॲक्ट खाली नोंदणी झालेली आहे म्हणून अपीलकर्त्याने सदरची माहिती धर्मदाय आयुक्तांकडे मागणी करणे आवश्यक आहे असे ॲड. गायकवाड यांनी सांगितले.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले ॲड. श्री एस. एन. गायकवाड यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्तीने महाविद्यालयाच्या स्थापनेपासून सन 2010पर्यंत विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी मागितलेली आहे. तथापी महाविद्यालयात स्वतंत्र यादी उपलब्ध नसल्याचे दिसून येते. तथापी महाविद्यालयाच्या स्थापनेपासून सन 2010पर्यंत महाविद्यालयात विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या अपीलकर्तीस वर्षनिहाय उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्तीने दि. 23.12.2010 च्या माहिती अर्जात नमुद केलेल्या 1 ते 3 मुद्यांच्या माहिती बाबत वर्षनिहाय विद्यार्थ्यांची संख्या उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्तीचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्तीचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस दि. 23.12.2010 च्या माहिती अर्जातील 1 ते 3 मुद्यांच्या माहिती बाबत विद्यार्थ्यांची संख्या वर्षनिहाय विनामुल्य कळवावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2174-2175

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 709 नाग/2011**

कु. विलास गोवर्धन पेटकर
मु. सिध्दार्थ नगर, पो. कोन्ढा 442503
ता. भद्रावती जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय, भद्रावती
ता. भद्रावती जि. चंद्रपूर
2) डॉ. के. डी. ठेंगणे
जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय, भद्रावती
ता. भद्रावती जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 18.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 23.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय, भद्रावती यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन
1) महाविद्यालयातील स्थानिक व्यवस्थापन समितीच्या (LMC) सभेच्या आजपर्यंत निघालेल्या नोटिसीच्या साक्षांकित प्रती 2) महाविद्यालयाच्या स्थापनेपासून स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) च्या सभे मध्ये आजपर्यंत घेतलेल्या ठरावाच्या साक्षांकित प्रती इत्यादी बाबत माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीला नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने ॲड. गायकवाड हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 23.12.2010 चा माहितीचा अर्ज प्राप्त झाला होता. तथापी सदरचे

महाविद्यालय भद्रावती शिक्षण संस्थेचे अंतर्गत असून सदरची शिक्षण संस्था ही बॉम्बे ट्रस्ट ॲक्ट खाली नोंदणी झालेली आहे म्हणून अपीलकर्त्याने सदरची माहिती धर्मदाय आयुक्तांकडे मागणी करणे आवश्यक आहे असे ॲड. गायकवाड यांनी सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय, भद्रावती महाविद्यालयाच्या स्थापनेपासून स्थानिक व्यवस्थापन समितीची माहिती मागितलेली आहे. सदरच्या महाविद्यालयास शासनाकडून अनुदान मिळत असते. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी हया शैक्षणिक संस्थेस लागू पडतात म्हणून अपीलकर्त्यास उपलब्ध माहिती देणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दि. 23.12.200 च्या माहिती अर्जातील 1 व 2 मद्यांची माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2155-2156

जा.क्र.————————— दि.................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 720 नाग/2011**

श्री गिरजाशंकर शिवविलास चौधरी
प्लॉट नं. 30 गेडाम ले–आऊट भामटी नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बा. स. राठोड
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकुलसचिव(विकास)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री हरीषभाई ठक्कर
जन माहिती अधिकारी तथा विद्यापीठ अभियंता
अभियांत्रीकी विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 22.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 7.2.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा विद्यापीठ अभियंता अभियांत्रीकी विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन 1) रिसीट नं. 222772 मध्ये वर्क ऑर्डरचे पैसे भरलेले आहे त्याची प्रत मागितलेली होती. 2) वर्क ऑर्डर नं. Engg/08/1827 दि. 15.12.2008 या वर्क ऑर्डरचे acceptance letter ची प्रत त्यांनी मागितलेली होती. आणि 3) वर्क ऑर्डर नं. Engg/08/1827 दि. 15.12.2008 या वर्क ऑर्डरमध्ये पैसे भरण्याची एम.डी.रिसिटची प्रत त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले सदरची माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील उपकुलसचिव यांचेकडे दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील खारीज करण्यात आले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा विद्यापीठ अभियंता श्री ठक्कर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकुलसचिव श्री राठोड हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री ठक्कर यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 7.2.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 17.2.2011 रोजी प्राप्त झाला होता. ततापी अपीलकर्त्याने मुद्या क्र. 1 मध्ये ज्या रिसिटची माहिती मागितलेली होती ती रिसीट लेखा शाखेकडून फाडलेली नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध नाही असे कळविण्यात आले. त्याचप्रमाणे मुद्या क्र.2 ची acceptance letter नसल्यामुळे त्याची माहिती उपलब्ध नाही असे कळविले. तथापी अपीलकर्त्यास या वर्क ऑर्डरची प्रत उपलब्ध करुन दिलेली

आहे. तसेच मुद्या क्र. 3 च्या माहिती संदर्भात देखील कोणतीही एम.डी.रिसिट त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही अशी माहिती देखील अपीलकर्त्यास दि. 25.2.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपकुलसचिव यांचेकडे दाखल केले. आणि प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळी देखील अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा दि. 25.2.2011 च्या पत्राने पाठविलेली माहिती उपलब्ध करुन दिली म्हणून प्रथम अपील खारीज करण्यात आले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने तीन मुद्यांच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. तथापी तीनही मुद्यांच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचेकडे कोणतीही माहिती उपलब्ध नाही असे अपीलकर्त्यास स्पष्टपणे जन माहिती अधिकारी यांनी दि. 25.2.2011 च्या पत्राने कळविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले. तसेच पुन्हा अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळी देखील जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. अपीलकर्त्यास सदरची माहिती मिळाल्याची पोच जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविली. म्हणून अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2158-2159

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 722 नाग / 2011**

श्री अलीम खॉन वल्द सलीम खॉन
क्वार्टर नं.186 / 4, सोमवारी क्वार्टर्स नागपूर
ता. जि. नागपूर – 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन)
पोलीस आयुक्त कार्यालय औरंगाबाद
ता. जि. औरंगाबाद
2) श्री एन. पी. झगरे पोलीस उप निरीक्षक
जन माहिती अधिकारी
पोलीस आयुक्त कार्यालय औरंगाबाद
ता. जि. औरंगाबाद ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 23.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 3.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन पोलीस उप निरीक्षक श्री रविन्द्र सोनवने हे दि. 5.6.2003 रोजी औरंगाबाद शहर येथे कार्यमुक्त करण्यात आलेले आहे. सद्या श्री सोनवने वाहतुक शाखेनंतर कोणत्या पदावर व कुठे कार्यरत आहे याची माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली मात्र सदरच्या माहितीमध्ये श्री सोनवने यांना दि. 5.6.2003 रोजी पोलीस स्टेशन छावणी येथे कार्यरत होते. एवढीच माहिती त्यांना दिली मात्र त्यानंतर त्यांची बदली कुठे झालेली आहे त्या संदर्भात त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस उपाआयुक्त यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले. तथापी त्यांना अपेक्षेप्रमाणे माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्री एन. पी. झगरे पोलीस उप निरीक्षक हे उपस्थित होते. आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने ए. जी. परजणे पोलीस उप निरीक्षक हे उपस्थित होते. त्यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 3.1. 2011 चा माहितीचा अर्ज दि. 6.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली. आणि अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरण्याबाबत दि. 26.1.2011 च्या पत्राने कळविण्यात आले. त्यानंतर अपीलकर्त्याने माहितीचे

शुल्क भरणा केले आणि अपीलकर्त्यास दि. 19.3.2011 रोजी माहिती स्पिड पोस्टाद्वारे पाठविण्यात आली आणि सदरची माहिती स्पिड पोस्टाद्वारे अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. तथापी सदरच्या माहितीमध्ये श्री सोनवने यांची बदली कुठे झालेली आहे त्याची माहिती त्यांना मिळालेली नाही. म्हणून प्रस्तुत प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दि. 19.3.2011 च्या पत्राने श्री सोनवने यांना दि. 5.6.2003 रोजी कार्यमुक्त करण्यात आले आहे असे कळविलेले आहे. तथापी श्री सोनवने त्यांना कोणत्या कारणास्तव दि. 5.6.2003 रोजी पोलीस स्टेशन छावणी येथून कार्यमुक्त करण्यात आलेले आहे त्याची माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास श्री रविन्द्र सोनवने यांना पोलीस स्टेशन छावणी येथून दि. 5.6.2003 रोजी कार्यमुक्त कोणत्या कारणास्तव करण्यात आलेले आहे याची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2158-2159

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 724 नाग/2011**

श्री भय्या भदुजी तलमले
प्लॉट नं. 6 प्रगती नगर मेडीकल कॉलनी जवळ नागपूर
ता. जि. नागपूर – 27 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी मिळकत व्यवस्थापक
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती कांता कलनाके
जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक–3
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 23.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 27.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक–3 नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्रीमती वैशाली ठाकरे यांनी अपीलकर्त्याच्या क्वार्टरच्या भिंतीला लागून अनधिकृत बांधकाम केलेले आहे त्याबाबत त्यांनी तक्रार केलेली होती. त्यावर केलेल्या कार्यवाही मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली आणि त्यामध्ये त्यांना असे दिसून आले की दि. 28.2.2011 रोजी मिळकत व्यवस्थापक यांनी श्रीमती वैशाली ठाकरे यांना अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याबाबत नोटीस दिलेली आहे तथापी त्या नोटीसीप्रमाणे अनधिकृत बांधकाम त्याप्रमाणे काढलेले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस तत्कालीन जन माहिती अधिकारी आणि विद्यमान जन माहिती अधिकारी हे दोन्हा आयोगासमोर उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने विधी सल्लागार उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 27.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले की सदर गाळा क्र. 10/12 च्या बांधकाम संबंधाने कार्यवाही सुरु असून तांत्रीक कार्यवाही पुर्ण होताच केलेल्या कार्यवाहीची माहिती आपणास तात्काळ कळविण्यात येईल अशी माहिती त्यांनी उपलब्ध करुन दिली त्यानंतर जन माहिती अधिकारी यांचेकडे प्रस्तुत प्रकरणी तांत्रीक अहवाल प्राप्त झाला आणि त्याला अनुसरुन श्रीमती वैशाली ठाकरे यांना दि. 28.2.2011 च्या नोटिसीद्वारे त्यांनी केलेले अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याची नोटिस त्यांना देण्यात आलेली आहे आणि त्या नोटिशिची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध

करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की श्रीमती वैशाली ठाकरे यांनी अद्यापही अनधिकृत बांधकाम काढलेले नाही त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की श्रीमती वैशाली ठाकरे यांना अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याबाबत दि. 28.2.2011 च्या नोटिसीद्वारे कळविण्यात आलेले आहे. तथापी त्यांनी अद्याप बांधकाम काढलेले नाही त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यापुढील कार्यवाहीचे अधिकार हे सक्षम अधिकारी यांना प्रदान केलेले आहेत म्हणून प्रस्तुत प्रकरणी पुढील योग्य ती कार्यवाही करण्याचा प्रस्ताव सक्षम अधिकारी यांचेकडे पाठविण्यात येईल असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी श्रीमती वैशाली ठाकरे यांना अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याबाबत नोटिस दिलेली आहे. तथापी त्या पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार हे सक्षम अधिकारी यांचेकडे असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी श्रीमती वैशाली ठाकरे याचे विरुध्द पुढील नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्याचा प्रस्ताव सक्षम अधिकारी यांचेकडे पाठविणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी श्रीमती वैशाली ठाकरे यांच्या अनधिकृत बांधकाम विषयी पुढील कार्यवाही करण्यासाठी सक्षम अधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठवावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2161-2162

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 733 नाग/2011**

श्री सेवक तिलकचंद लिल्हारे
रा. कटंगटोला पो. कटंगीकला
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री सी. एन. रंगारी
जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अधिकारी,
तहसिल कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 24.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 19.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अधिकारी, तहसिल कार्यालय गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन कार्डधारक (कार्ड क्र. 420972) तिलकचंद गोकुळ लिल्हारे हा मरण पावला आहे व त्याच्या कोणत्या वारसांना हे कार्ड निर्गमित केले आहे त्याबाबतची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून 30 दिवसात माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील तहसिलदार गोंदिया यांचेकडे दि. 28.11.2010 रोजी दाखल केले. त्यानंतर त्यांना दि. 21.8.2011 ला माहिती प्राप्त झाली मात्र सदरची माहिती त्यांना विलंबाने प्राप्त झाली म्हणून विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे त्यांनी सुनावणीत सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अधिकारी श्री सी. एन. रंगारी हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि.

19.6.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. मात्र त्यांच्याकडे पुरवठा विभागाचे संपूर्ण कामकाज असल्यामुळे रेशन दुकानदारांना अन्नधान्य वाटप करणे, साखरेचे वाटप करणे, लेखा विभागाचे काम करणे तसेच इतर पत्रव्यवहार करणे इत्यादी कामे त्यांच्याकडे असल्यामुळे तसेच कार्यबाहुल्यामुळे अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन देवू शकलो नाही. तथापी अपीलकर्त्याने तहसिलदार गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दाखल केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती स्वतः काढली आणि अपीलकर्त्यास सदरची माहिती दि. 20.8.2011 च्या पत्राने तयार करुन अपीलकर्त्यास दि. 21.8.2011 रोजी स्वतः त्यांनी अपीलकर्त्याच्या घरी नेवून दिली आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास दि. 21.8.2011 ला प्राप्त झाल्याची पोच त्यांनी आयोगापुढे दाखविली.

4. जन माहिती अधिकारी यांच्याकडील दि. 20.8.2011 च्या पत्राची माहिती अपीलकर्त्यास दि. 21.8.2011 ला प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

5. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार यांनी त्यांच्याकडील लेखी निवेदनात असे नमुद केलेले आहे की अपीलकर्त्यास माहिती विलंबाने प्राप्त झाली आहे आणि या विलंबाच्या कालावधीकरीता जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून हे दोषी आहेत असे त्यांनी नमुद केलेले आहे.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार यांचे लेखी निवेदन विचारात घेता असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 19.6.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसत नाही मात्र त्यानंतर जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून श्री रंगारी यांनी अपीलकर्त्यास दि. 20.8.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून सदरची माहिती विलंबाने उपलब्ध होण्यास जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून श्री रंगारी हे जबाबदार दिसून येतात. विलंबाबद्यल त्यांना खुलासा विचारला असता कार्यबाहुल्यामुळे 30 दिवसाच्या मुदतीत ते माहिती उपलब्ध करुन देवू शकले नाही असा खुलासा त्यांनी आयोगापुढे केला. मात्र सदरचा खुलासा मान्य करण्यासारखा नाही. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.
2) जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून श्री रंगारी यांनी अपीलकर्त्याच्या दि. 19.6.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्यानंतर दि. 20.8.2011 च्या पत्राने

अपीलकर्त्यास  माहिती उपलब्ध करुन दिली सदरच्या विलंबास जन माहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. त्याकरीता त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु.5000/– रू. पांच हजार शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) सदरच्या शास्तीच्या रकमेची वसुली तहसिलदार गोंदिया यांनी करावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

Ageyord6.2162-2164

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 734 नाग/2011 व अपील क्रमांक 735 नाग/2011**

श्री संतोषकुमार नामदेव शेडमाके
रा. गारेक्षण वार्ड, एफ.डि.सि.एम. कॉलनी
टाईप 11/67, बल्लारपूर
ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक
वडसा वनविभाग, वडसा
ता. वडसा जि. गडचिरोली

2) श्री एस. जी. भोवते
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक(स.अ.)
वडसा वनविभाग, वडसा
ता. वडसा जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 735 नाग/2011</u>**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक
मध्य चांदा वनविभाग चंद्रपूर
मुल रोड, चंद्रपूर

2) श्री बी. आर. काळे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक
तेंदु मध्य चांदा वनविभाग चंद्रपूर
मुल रोड, चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.5.2011 रोजी अपील क्रमांक 734 नाग/2011 व अपील क्रमांक 735 नाग/2011 ही दोन द्वितीय अपीले राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दाखल केलेली आहेत. या दोन्ही द्वितीय अपीलांमध्ये अपीलकर्ता हे एकच असल्यामुळे आणि माहितीच्या अर्जात

मागितलेली माहिती देखील सारख्याच स्वरुपाची असल्यामुळे दोन्ही अपीलांच्या सुनावणीसाठी आयोगाचे कार्यालयातून दि. 22.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 24.8. 2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. दोन्ही अपीलांत मागितलेल्या माहितीचे स्वरुप हे एकच असल्यामुळे आणि अपीलकर्ता देखील हे एकच असल्यामुळे दोन्ही अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यात आली.

3. <u>अपील क्रमांक 734 नाग/2011</u> – आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 15.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक वडसा वनविभाग, वडसा ता. वडसा जि. गडचिरोली यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन गायत्री टिंबर बल्लारपूर यांनी सन 2007 ते 2010पर्यंत या मागील तीन वर्षात आपल्या डेपोतून लाकूड खरेदी करुन परस्पर विक्री केली असता आपले शासकीय काष्ट भांडारातून पार्टीने परस्पर माल उचलला त्याबाबत प्रपत्र अ आणि प्रपत्र ब मध्ये त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून प्रपत्र अ ची माहिती मिळाली मात्र प्रपत्र ब मधील माहिती मिळाली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक वडसा वनविभाग श्री एस. जी. भोवते उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 15.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 18.10. 2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील महसूल व जंगल कामगार कक्षाशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी दि. 26.10.2010 रोजी संबंधित कक्षाला पत्र पाठवून माहिती मागितली. संबंधित कक्षाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. 18.11.2010 रोजी माहितीचे शुल्क भरण्याबाबत पत्र दिले. त्यानुसार अपीलकर्त्याने दि. 6.12.2010 रोजी माहितीचे शुल्क भरणा केले आणि अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरणा केल्यानंतर दि. 7.12.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांना प्रपत्र अ ची माहिती फक्त प्राप्त झाली मात्र प्रपत्र ब ची माहिती त्यांना मिळाली नाही असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की प्रपत्र ब ची माहिती ही त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नाही. म्हणून वनविभागाच्या ज्या कार्यालयाशी सदरची माहिती संबंधीत आहे त्यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविणे आवश्यक होते. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी आता अपीलकर्त्याच्या प्रपत्र ब ची माहिती ज्या कक्षाशी संबंधीत आहे त्या कक्षाकडून प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

5. **<u>अपील कमांक 734 नाग/2011</u>** – आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 15.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक तेंदु मध्य चांदा वनविभाग चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन गायत्री टिंबर बल्लारपूर यांनी सन 2007 ते 2010पर्यंत या मागील तीन वर्षात आपल्या डेपोतून लाकूड खरेदी करुन परस्पर विक्री केली असता आपले शासकीय काष्ट भांडारातून पार्टीने परस्पर माल उचलला त्याबाबत प्रपत्र अ आणि प्रपत्र ब मध्ये त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून प्रपत्र अ ची माहिती मिळाली मात्र प्रपत्र ब मधील माहिती मिळाली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

6. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक तेंदु मध्य चांदा वनविभाग चंद्रपूर श्री बी. आर. काळे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 15.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील कक्ष 6 शी संबंधीत असल्याने त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेतली आणि अपीलकर्त्यास दि.11. 11.2010 च्या पत्राने त्यांच्या कार्यालयात ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध होती ती माहिती माहितीचे शुल्क भरुन घेवून अपीलकर्त्यास देण्यात आली. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास प्रपत्र अ मधील पूर्ण माहिती आणि प्रपत्र ब मधील दि. 23.8.2011पर्यंत उपलब्ध असलेली माहिती आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. आणि प्रपत्र ब मधील उर्वरीत माहिती शोधण्याचे काम चालू असून ती माहिती अपीलकर्त्यास लवकर देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले.

7. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास प्रपत्र अ ची संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र प्रपत्र ब मधील दि. 23.8.2011पर्यंत उपलब्ध असलेली माहिती आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. तथापी प्रपत्र ब मधील उर्वरीत माहिती अपीलकर्त्यास 15 दिवसात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील कमांक 734 नाग/2011 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील प्रपत्र ब ची माहिती ज्या कक्षाशी किंवा कार्यालयाशी संबंधित आहे त्यांच्याकडून प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 735 नाग/2011 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास
प्रपत्र ब ची उर्वरीत माहिती विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2166-2169

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 686 नाग/2011**

श्री विजयसिंह विठ्ठलसिंह सेंगर
डबलींग कॉलनी रेल्वे ग्राऊड जवळ सिव्हील लाईन, गोंदिया
ता. जि. गोंदिया –441601 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री विजय गोरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी
नगर परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री एस. एस. मेश्राम
जन माहिती अधिकारी
नगर परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 26.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 25.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 27.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी नगर परिषद गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन नगर परिषदेतील सेवानिवृत्त कर्मचा–याचे 5 वा वेतन आयोग आणि 6 व्या वेतन आयोगाप्रमाणे निवृत्त वेतन फरक राशी, ग्रॅच्यूटी, कम्युटेशन, रजारोख रक्कम, इत्यादीच्या संदर्भात थकबाकीची माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीमध्ये रजा रोखीकरण आणि कम्युटेशन फरक इत्यादीची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्री मेश्राम आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी श्री विजय गोरे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्यास त्यांच्याकडून नगर परिषदेतील सेवानिवृत्त कर्मचा–याचे 5 वा वेतन आयोग आणि 6 व्या वेतन आयोग या संदर्भात त्यांच्या कार्यालयाकडे ज्या नमुन्यात माहिती उपलब्ध होती त्या नमुन्यातील माहिती अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली माहिती आज आयोगा समोर दाखविण्यात आली. सदरच्या माहितीबाबत अपीलकर्ता आणि मुख्य अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी यांच्या सोबत चर्चा झाली. आणि चर्चेनुसार असे दिसून आले की अपीलकर्त्यास 5 वा वेतन आयोग आणि 6 व्या वेतन आयोगाच्या थकबाकीच्या संदर्भात नगर परिषदेतील उपलब्ध असलेल्या नमुन्यातील माहिती दिलेली आहे. तथापी सदरच्या माहितीमध्ये रजा रोखीकरण आणि पेंशन विक्री फारक यांच्या थकबाकीची

माहिती त्यामध्ये दिसून येत नाही. म्हणून दोघांच्या संमतीने असे ठरविण्यात आले की जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसाच्या आत अपीलकर्त्यास 5 वा वेतन आयोग आणि 6 व्या वेतन आयोगाची रजा रोखीकरण आणि पेंशन विक्री बाबतच्या फरकाची थकबाकीची रक्कम उपलब्ध करुन द्यावी. त्यासाठी आवश्यकता असल्यास अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना योग्य ते सहकार्य करावे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना नगर परिषदेच्या सेवानिवृत्त कर्मचा–याच्या संदर्भात 5 व्या वेतन आयोग आणि 6 व्या वेतन आयोगाच्या रजा रोखीकरण आणि पेंशन विक्री फरकाच्या थकबाकीची रक्कम उपलब्ध करुन द्यावी. त्यासाठी आवश्यकता वाटल्यास अपीलकर्त्याचे सहकार्य घ्यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2170-2171

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 739 नाग/2011**

श्री आनंदकर मधुकररावजी मेश्राम
वार्ड नं. 2 नविन वसाहत 89, बावला नगर, बुटिबोरी
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक(प्रशासन)
राज्य कामगार विमा योजना, मुंबई
पंचदीप भवन, 6 वा मजला, ना.म.जोशी मार्ग,
लोअर परेल, मुंबई 400013
2) जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय प्रशासन अधिकारी,
राज्य कामगार विमा योजना, विदर्भ विभाग नागपूर
इमामवाडा नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 25.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 18.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी राज्य कामगार विमा योजना, विदर्भ विभाग नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर मार्फत आपल्याला शिस्तभंग विषयक कार्यवाही बाबतचा निवाडा देण्यात आला असून आपण सदर निकालाची प्रत वरीष्ठ कार्यालयास सादर केली काय व आपणावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात आली काय तसेच उपरोक्त निकालपत्र वरीष्ठ कार्यालयास सादर केले असल्यास त्या पत्राची प्रत देण्यात यावी अशी माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहितीचे शुल्क भरण्याबाबत पत्र प्राप्त झाले. त्यानुसार त्यांनी माहितीचे शुल्क भरले आणि त्यांना माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीमध्ये राज्य माहिती आयोगाकडील निकालाची प्रत वरीष्ठ कार्यालयास कार्यवाहीसाठी पाठविली किंवा नाही याबाबतची त्यांना माहिती मिळाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांच्या वतीने श्री जोशी अधिक्षक हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक मुंबई यांच्या वतीने डॉ. एस. के. देशमुख वैद्यकीय प्रशासकीय अधिकारी हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री जोशी अधिक्षक यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 18.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 25.1.2011 रोजी प्राप्त झाला होता. अर्जदाराने दि. 1.7.2010 ते दि. 31.12.2010 या कालावधीतील माहिती मागितलेली होती. म्हणून सदरच्या माहितीचे शुल्क आणि डाक खर्च रु. 126/— भरण्याबाबत दि. 22.2.2011 च्या पत्राने कळविले. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने दि. 3.3.2011 ला माहितीचे शुल्क भरले आणि अपीलकर्त्यास दि. 8.3.2011 च्या पत्राने नोंदणीकृत डाकेने

माहिती पुरविण्यात आली. तसेच श्री जोशी यांनी आयोगा पुढे सांगितले की अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात श्री गोपीनाथ क. भगत यांनी राज्य माहिती आयोग यांचे कडील अपील क्रमांक 870/2010 मधील आदेश पारीत दि. 16.7.2010 च्या संदर्भात माहिती मागितलेली होती. आणि त्या आदेशाच्या संदर्भात अपीलकर्त्यास एकुण 33 पेजेसची माहिती पाठविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र सदरच्या माहितीमध्ये राज्य माहिती आयोगाकडील अपील क्रमांक 870/2010 मधील निर्णय दि. 16.7.2010 चा हा निर्णय वरीष्ठ कार्यालयास कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला किंवा नाही याची माहिती त्यांना मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की राज्य माहिती आयोगाकडील अपील क्रमांक 870/2010 मधील निर्णय दि. 16.7.2010 च्या निर्णयाची प्रत जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय प्रशासन अधिकारी, राज्य कामगार विमा योजना, विदर्भ विभाग नागपूर यांचे नावे पाठविली असल्याने ते आपले कार्यालयात सादर करण्यात आली नाही असे संचालक यांना दि. 5.5.2011 च्या पत्राने कळविलेले आहे. आणि ही माहिती अपीलकर्त्यास 33 पेजेसची माहिती पाठविलेल्या माहिती मध्ये दिलेली आहे असे नमुद केले. तथापी अपीलकर्त्याने आयोगासमोर सांगितले की जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 8.3.2011 च्या पत्राने पाठविलेल्या 33 पेजेसच्या माहितीमध्ये दि. 5.5.2011 चे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही. म्हणून आज आयोगा समोर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 5.5.2011 च्या पत्राची प्रत पुन्हा उपलब्ध करुन दिली. सदरची प्रत अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली. अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2173-2174

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 749 नाग/2011**

श्री एम. जी. गंथाळे
द्वारा श्रीमती सुशीलाबाई गो. गंथाळे, वार्ड क्र.15 ते 30 च्या मागे
इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय,
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) डॉ. एम. बी. खामगावकर
प्रथम अपीलीय अधिकारी
इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती न्यालेवार
जन माहिती अधिकारी
इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.8.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 26.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 24.2.2011 रोजी जन माहिती अधिकारी इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन कु. एन. व्ही. न्यालेवार प्रशासकीय अधिकारी इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर यांच्या संबंधी माहिती मागितलेली होती. त्या माहिती मध्ये कु. न्यालेवार यांची प्रथम नियुक्ती गृहपाल या पदावर तसेच प्रशासकीय अधिकारी या पदावर नियुक्ती पासून ते आजपर्यंत इत्यादी संदर्भात त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना दि. 21.3.2011 रोजी असे कळविले की आपण मागितलेली माहिती ही त्रयस्थ व्यक्तीची आहे आणि त्रयस्थ व्यक्तीने त्यांची वैयक्तीक स्वरुपाची माहिती देण्यास

नकार दिला असल्यामुळे आपणास ही माहिती पुरविता येत नाही असे त्यांनी कळविले म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर श्रीमती न्यालेवार हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक डॉ. एम. बी. खामगावकर हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्रीमती न्यालेवार यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्रयस्थ व्यक्तीशी संबंधीत असल्याने सहा. जन माहिती अधिकारी यांनी दि. 15.3.201 च्या पत्राने त्रयस्थ व्यक्ती कु. एन. व्ही. न्यालेवार यांना अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत संमती किंवा असंमती कळविण्यात यावी असे पत्र त्यांना देण्यात आले. त्याला अनुसरुन कु. न्यालेवार यांनी सहा. जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 29.3.2011 च्या पत्राने असे कळविले की माहिती मागणारे श्री एम. जी. गंथाळे हे माहितीच्या करीता त्रयस्थ व्यक्ती आहेत शिवाय त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती वैयक्तीक व सेवा अभिलेख संबंधाने असल्यामुळे गोपनिय स्वरुपाची आहे त्यांनी मागितलेली माहिती केवळ हेतुपुरस्सर मागितलेली असल्याचे लक्षात येत आहे तसेच माहिती मागण्यामध्ये त्यांचा हेतू शुध्द दिसून येत नाही. म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देवू नये असे कु. न्यालेवार यांनी सहा. जन माहिती अधिकारी यांना कळविले आणि त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 21.3.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की आपण मागितलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची आहे आणि सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास त्रयस्थ पक्षाने नकार दिलेला आहे म्हणून आपणास माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 11 आणि 8 नुसार सदरची माहिती देता येत नाही असे अपीलकर्त्यास कळविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

5. तसेच त्रयस्थ व्यक्ती म्हणून कु. न्यालेवार यांनी आयोगा पुढे असेही सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्यांची वैयक्तीक माहिती आहे आणि सदरची माहिती अपीलकर्त्याने त्यांना त्रास देण्याच्या हेतुने व त्यांना मनःस्ताप देण्याच्या हेतुने मागितलेली आहे तसेच सदरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्यास त्यांना अपीलकर्ता हे मानसिक त्रास देवू शकतात म्हणून त्यांना त्यांची वैयक्तीक माहिती देण्यात येवू नये असे त्यांनी आयोगापुढे सुनावणीच्या वेळी सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही कोणत्याही व्यापक जन हिताकरीता मागितलेली दिसून येत नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (जे) अन्वये जी माहिती व्यक्तीच्या खाजगी बाबतीत विनाकारण

हस्तक्षेप करील अशा व्यक्तीस कोणत्याही स्वरुपाची वैयक्तीक माहिती देता येत नाही त्यामुळे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी माहिती न देण्याचा घेतलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2176-2178

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 750 नाग/2011**

श्री चंद्रकांत केशवराव पांडे
विठ्ठल नगर गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया

2) श्री आर. एस. तुरकर
जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, गोंदिया
तहसिल कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 26.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की सदर प्रकरणी त्यांना माहिती मिळाली म्हणून अपील मागे घेत असल्याचे अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2180-2181

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 751 नाग/2011, अपील कमांक 752 नाग/2011, अपील कमांक 753 नाग/2011**

श्री जयवंत मधुकर मिश्रा
प्लॉट नं. 16, जवाहर कॉलनी
मु. पो. पुलगाव 442302
ता. देवळी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद कार्यालय वर्धा
ता. जि. वर्धा

2) श्री एस. एम. वानखेडे कक्ष अधिकारी
जन माहिती अधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद कार्यालय विभाग वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये अपील कमांक 751 नाग/2011, अपील कमांक 752 नाग/2011, अशी दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत आणि दिनांक 15.5.2011 रोजी अपील कमांक 753 नाग/2011 दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 26.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. अपीलकर्ता यांनी अपील कमांक 751 नाग/2011, अपील कमांक 752 नाग/2011, आणि अपील कमांक 753 नाग/2011 या तिन्ही अपीलांमध्ये माहिती मिळाल्याने अपील मागे घेत असल्याचे लेखी निवेदन अपीलकर्ता यांनी दिले आहे. त्यामुळे सदरची तीन्ही अपीले खारीज करण्यात येत आहेत.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 751 नाग/2011, अपील क्रमांक 752 नाग/2011, आणि अपील क्रमांक 753 नाग/2011 खारीज करण्यात येत आहेत.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2183-2184

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 758 नाग/2011**

श्री जितेन्द्र येमराज बलभद्रे
मु. पो. कारंजा
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
ग्रामणी पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री एस. व्ही. गौडीया
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
ग्रामणी पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 27.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 29.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 6.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 8.12.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या अर्जात अर्जुनी (परतवाडा) ता. तिरोडा येथील पाणी टाकीचे बांधकाम संबंधात वर्क ऑर्डर, करारनाम्याची प्रत, सर्व देयके कामाची स्थिती, कामाची यादी तसेच कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांच्या सेवा पुस्ताकची प्रत इत्यादी 1 ते 5 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यानुसार अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्त्यास दि. 18.12.2010 रोजी पत्राद्वारे असे कळविण्यात आले की आपण मागितलेली माहिती मुद्या क्र. 1 ते 4 ची तयार असून त्या माहितीचे शुल्क रु. 242/— भरणा करुन माहिती घेवून जावी आणि मुद्या क्र. 5 ची माहिती ही सेवा पुस्ताकाच्या संदर्भात असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत नियम 8 प्रमाणे देता येत नाही असे अपीलकर्त्यास कळविण्यात आले. तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा केले नाही म्हणून अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 18.12.2010 च्या पत्राने माहितीचे शुल्क भरणा करण्याबाबतचे पत्र पोस्टाद्वारे पाठविण्याबाबत जावक रजिस्टरचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविला. त्यावरुन अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी माहितीचे शुल्क भरण्याबाबतचे पत्र पोस्टाद्वारे पाठविल्याचे दिसून येते.

3. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दाखल केले. आणि कार्यकारी अभियंता यांनी देखील अपीलकर्त्यास दि. 18.4.2011 आणि दि. 11.5.2011 च्या पत्राने माहितीचे शुल्क भरुन घेवून माहिती घेवून जाण्याबाबत कळविले आहे. तथापी त्यानंतर अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

4. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या 6.12.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 18.12.2010 च्या पत्राने माहितीचे शुल्क 1 ते 4 मुद्यांचे रु. 242/— भरण्याबाबत कळविलेले दिसून येते. आणि मुद्या क्र. 5 बाबत सेवा पुस्तकाच्या संदर्भात माहिती अधिकार नियम 8 अन्वये माहिती देता येत नाही असे कळविलेले आहे. तथापी याबाबत असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेल्या सेवा पुस्तकाच्या प्रतीचे शुल्क भरुन घेवून त्याच्या प्रती देखील तात्काळ अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. कारण कर्मचा—याचे सेवा पुस्ताक तयार करण्याचे काम हे कार्यालय करीत असते आणि कार्यालयात तयार केलेली माहिती नागरीकांनी मागितल्यास ती उपलब्ध करुन देणे माहिती अधिकारान्वये आवश्यक आहे तथापी अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांनी दि. 18.12.2010 च्या पत्राने कळविल्या नुसार माहितीचे शुल्क भरुन घेवून माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे त्यांच्या दि. 18. 12.2010 च्या पत्राने कळविल्याप्रमाणे माहितीचे शुल्क भरणा करावे तसेच मुद्या क्र. 5 च्या संदर्भात सेवा पुस्तकाच्या छायांकित प्रती अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरुन घेवून त्या देखील उपलब्ध करुन द्याव्या त्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सेवा पुस्तकाच्या माहितीचे शुल्क हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत कळवावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2186-2187

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 761 नाग/2011**

श्री मो. गुलशाद मो. हनिफ
रा. सुभाष वार्ड रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गिरीष जोशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर
2) श्री एस. जी. समर्थ
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 27.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 29.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 21.2.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार रामटेक यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन अर्जदाराच्या वडीलोपार्जीत शेत जमीनीतून त्याला भूमीहीन केल्याबद्यल त्यांनी दि. 22. 11.2010 रोजी तक्रार अर्ज दिला होता त्यावर झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना दि. 16.3.2011 च्या पत्राने तहसिलदार रामटेक यांनी अशी माहिती उपलब्ध करुन दिली की अर्जदाराच्या वडीलोपार्जीत शेत जमीनीतील त्याला भूमीहीन केल्याबद्यल तक्रारी संबंधात दि. 22.11. 2010 तक्रारी नुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळण्याबाबत अर्ज केला आहे. त्यानुसार सदर प्रकरणामध्ये मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी नागपूर यांचे दि. 24.12.2010 च्या आदेशानुसार प्रकरणास स्थगिती दिली म्हणून प्रकरण प्रलंबित आहे अशी माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली. तथापी त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी यांचेकडे दाखल केले. उपविभागीय अधिकारी यांनी देखील तहसिलदार यांनी दि. 16.3.2011 च्या पत्राने दिलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली. मात्र त्याबाबत त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार रामटेक श्री एस. जी. समर्थ हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, रामटेक श्री गिरीष जोशी हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार रामटेक श्री समर्थ यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 21.2.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या

कार्यालयाकडे दि. 23.2.2011 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली. आणि अपीलकर्त्यास दि. 16.3.2011 च्या पत्राने असे कळविले की आपल्या दि. 22.11.2010 तक्रारी नुसार कळविण्यात येते की सदर प्रकरणामध्ये मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी नागपूर यांचे दि. 24.12.2010 च्या आदेशानुसार प्रकरणाला स्थगिती दिल्यामुळे प्रकरण प्रलंबित आहे अशी माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. त्याचप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, रामटेक यांनी देखील अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार रामटेक यांनी दि. 16.3.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली माहिती अपीलकर्त्यास पाठविली असल्याचे श्री गिरीष जोशी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, रामटेक यांनी आयोगा पुढे सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास दि. 16.3.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2189-2190

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 765 नाग/2011**

श्री पांडुरंग कारुजी तितरमारे
C/o. श्री एन.के.ठाकरे, प्लॉट नं. 277 श्री गुरुदेव नगर
न्ंदनवन नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती सुलोचना निघडे अधिक्षक
प्रथम अपीलीय अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा
ता. जि. वर्धा
2) श्री जी. डी. फरताडे अव्वल कारकून
जन माहिती अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 27.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 30.8.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा श्री जी. डी. फरताडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक श्रीमती सुलोचना निघडे हया उपस्थित होत्या.

3. जन माहिती अधिकारी श्री जी. डी. फरताडे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 22.2.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 28.2.2011 रोजी प्राप्त झाला होता. सदरच्या माहितीच्या अर्जात अपीलकर्त्याने मा. कृषि सहसंचालक कृषि आयुक्तालय पूणे यांचेकडील दि. 23.5.2006 च्या पत्राच्या संदर्भात माहिती मागितलेली होती. तथापी सदरची माहिती ही कृषि विभागाशी संबंधित असल्याने अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज दि. 3.3.2011 च्या पत्राने विभागीय कृषि सहसंचालक नागपूर विभाग नागपूर यांचेकडे हस्तांतर करण्यात आला आणि अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले. आणि त्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास पाठवून अपीलकर्त्याने त्यांना पाहिजे असलेल्या माहितीच्या संदर्भात विभागीय कृषि सहसंचालक नागपूर यांचेशी संपर्क साधावा असे कळविले.

4. त्याला अनुसरुन विभागीय कृषि सहसंचालक नागपूर यांनी दि. 15.3.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती पंजीबध्द डाकेने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले.

5. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक श्रीमती सुलोचना निघडे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा प्रथम अपीलाचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही. म्हणून प्रथम अपीलाची सुनावणी घेण्याचा आणि निर्णय देण्याचा प्रश्न उदभवत नाही असे त्यांनी आयोगा पुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 22.2.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयाने दि. 15.3.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास पंजीबध्द डाकेने माहिती पाठविल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्त्यास माहिती प्राप्त झाल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2192-2193

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 762 नाग/2011 व अपील क्रमांक 763 नाग/2011

श्री राजेश नवलकिशोर ठाकूर
विशाखा निवास, अजय नगर अंबाझरी हिल टॉप, नागपूर
ता. जि. नागपूर – 440033 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अंजनकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर
2) श्री एस. एम. टेंभूर्णे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत अडेगांव
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 763 नाग/2011</u>**

3) श्री एस. एम. टेंभूर्णे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत गिदमगढ
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.8.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.5.2011 रोजी अपील क्रमांक 762 नाग/2011 व अपील क्रमांक 763 नाग/2011 राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. या दोन्ही द्वितीय अपीलांमधील मागितलेल्या माहितीचे स्वरुप हे सारखे असल्यामुळे तसेच अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे एकच असल्यामुळे दोनही अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यासाठी आयोगाचे कार्यालयातून दि. 27.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 30.8.2011 रोजी दोन्ही द्वितीय अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. **<u>अपील क्रमांक 762 नाग/2011</u>**– आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 25.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत अडेगांव यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन ग्रामपंचायत अडेगांव संदर्भात 1 ते 15 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विस्तार अधिकारी, पंचायत समिती हिंगणा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. आणि अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती देण्याचे आदेश दिले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत अडेगांव श्री एस. एम. टेंभूर्णे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री अंजनकर हे उपस्थित होते.

4. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत अडेगांव श्री टेंभूर्णे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 25.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी म्हणून तत्कालीन ग्रामसेवक श्री लोकेश कोरडे हे कार्यरत होते. त्यांनी अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे रेकॉर्ड वरुन दिसून येते असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच त्यांनी या ग्रामपंचायतचा पदभार दि. 15.3.2011 रोजी घेतलेला आहे. तथापी त्यांना अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज प्राप्त झाला नाही तसेच प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांच्याकडे माहितीचा अर्ज प्राप्त झाला नाही. मात्र द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या नोटिस सोबत अपीलाचा अर्ज प्राप्त झालेला आहे त्याची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 25.1. 2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री लोकेश कोरडे यांनी 30 दिवसाच्या मुदतीत अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. तथापी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेकडे अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज उपलब्ध झाला असल्यामुळे त्यांनी 15 दिवसात अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

6. **<u>अपील क्रमांक 763 नाग/2011</u>**– आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 25.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत गिदमगढ यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन ग्रामपंचायत गिदमगढ संदर्भात 1 ते 15 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी

त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विस्तार अधिकारी, पंचायत समिती हिंगणा यांचेकडे दाखल केले. मात्र विस्तार अधिकारी यांनी शुल्क भरुन घेवून माहिती प्राप्त करावी असा निर्णय दिल्यामुळे त्यांनी त्या निर्णयावर नाराज होवून आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

7. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत गिदमगढ श्री एस. एम. टेंभूर्णे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री अंजनकर हे उपस्थित होते.

8. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत गिदमगढ श्री टेंभूर्णे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 25.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने 1 ते 15 मुद्यांबाबत ग्रामपंचायत गिदमगढ बाबत माहिती मागितलेली होती. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही प्रश्नोत्तरीय स्वरूपाची व क्लिष्ट आणि अनाकलनीय प्रकारची असल्यामुळे अपीलकर्त्यास निश्चित स्वरूपात कोणती माहिती पाहिजे आहे याचा बोध होण्यासाठी दि. 5.2.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास पत्र पाठविले आणि माहिती बाबत त्यांच्या कार्यालयात हजर राहण्याबाबत कळविले. तथापी अपीलकर्त्यास निश्चित स्वरूपात कोणती माहिती पाहिजे आहे हे सांगण्यासाठी अपीलकर्ता यांच्या कार्यालयात हजर झाले नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. अपीलकर्त्यास दि. 5.2.2011 चे पत्र पोस्टाने प्राप्त झाले नाही असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सुनावणीत सांगितले. तथापी सदरचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 8.2.2011 रोजी पोस्टाने यु. पी.सी.द्वारे पाठविल्याचा पुरावा त्यांनी आयोगापुढे दाखविला. त्यावरुन सदरचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पोस्टाद्वारे पाठविल्याचे दिसून आले.

9. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील विस्तार अधिकारी यांचेकडे दाखल केले. आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरुन घेवून माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिला असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

10. अपीलकर्त्याने दि. 25.1.2011 च्या माहितीच्या अर्जाखाली मागितलेल्या माहितीचे वाचन आयोगासमोर करण्यात आले. त्यामध्ये अपीलकर्त्याने मागितलेली काही माहिती ही मोघम स्वरूपाची असल्याचे दिसून येते तथापी सुनावणीच्या वेळी झालेलया चर्चे नुसार अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील जी माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असेल ती माहिती अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरुन घेवून प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 762 नाग/2011 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असेलेली माहिती विनामुल्य अपीलकर्त्यास व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री लोकेश कोरडे यांनी अपीलकर्त्याच्या दि. 25.1.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला असल्यामुळे ते विलंबास जबाबदार दिसून येतात. म्हणून विलंबाबद्यल त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 5000/- शास्तीची कार्यवाही त्यांचेवर कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसात आयोगापुढे सादर करावा.

3) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती हिंगणा यांनी सदरच्या निर्णयाची एक प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री लोकेश कोरडे यांचेकडे खुलासा करण्यसाठी पोस्टाने पाठवावी आणि त्याची पोच आयोगाच्या कार्यालयात सादर करावी.

4) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 763 नाग/2011 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी अपीलकर्त्यास माहितीच्या शुल्काची रक्कम कळवावी आणि त्यानंतर अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा केल्यानंतर अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2186-2189

जा.क्र.---------- दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.